| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २८० वा | शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## अजित पवारांच्या अस्थी संकलनावेळी पवार कुटुंब एकत्र

### शरद पवार स्वतः उपस्थित, अस्थींचे दर्शन घेतले; संपूर्ण वातावरणात शोक आणि शांतता

**पुणे/प्रतिनिधीः अंत्यसंस्कारानंतर शुक्रवारी अजित पवारांच्या अस्थी गोळा करण्यात आल्या. बारामतीतील विद्या प्रतिष्ठान परिसरात सकाळी हा विधी पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार स्वतः उपस्थित होते. त्यांनी अजित पवारांच्या अस्थींचे दर्शन घेतले. या वेळी पार्थ पवार, जय पवार, रोहित पवार, राजेंद्र पवार, रणजित पवार, श्रीनिवास पवार, युगेंद्र पवार यांच्यासह पवार कुटुंबातील अनेक सदस्य आणि निकटवर्तीय कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण वातावरणात शोक आणि शांतता जाणवत होती.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण राज्य शोकसागरात बुडाले असून, गुरुवारी दुपारी बारामतीत त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर दुपारी १२ वाजता हा अंत्यविधी पार पडला. शासकीय इतमामात बंदुकीच्या सलामीसह त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्याने राजकीयच नव्हे तर सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली असून, अंत्यसंस्कारावेळी उपस्थित असलेले वातावरण अत्यंत भावनिक होते.



अंत्यसंस्काराच्या वेळी अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी आपल्या वडिलांना मुखाग्नी दिला. हा क्षण उपस्थित प्रत्येकासाठी अत्यंत वेदनादायक होता. कुटुंबीय, नातेवाईक, कार्यकर्ते आणि राज्यभरातून आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजारो लोकांनी डोळ्यात अश्रू ठेवत आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला. बारामती परिसरात शोककळा पसरली होती आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दुःखाची छाया स्पष्ट दिसत होती.

दरम्यान, अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून या घटनेची सीआयडी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच बारामती पोलिसांना अपघातस्थळावर कोणालाही प्रवेश देऊ नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. फॉरेन्सिक पथकाने यापूर्वीच अपघातस्थळी जाऊन आवश्यक नमुने गोळा केले असून, ते तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या प्रकरणाचा तपास बारामती पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या एक्सिडेंटल डेथ रिपोर्टच्या अनुषंगाने केला जाणार आहे.

सरकारच्या प्राथमिक अहवालानुसार, सदर विमान २८ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजून १८ मिनिटांनी पहिल्यांदा बारामती विमानतळाच्या संपर्कात आले होते. एटीसीकडून वैमानिकांना त्या वेळी वाऱ्याचा वेग कमी असून दृश्यमानता सुमारे ३००० मीटर असल्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर पायलटने आपण रनवे क्रमांक ११ च्या दिशेने येत असल्याचे कळवले. मात्र, त्यांना रनवे स्पष्टपणे दिसत नसल्याचे त्यांनी एटीसीला सांगितले.

यानंतर पायलटने रनवे दिसू लागल्यावर कळवतो असे सांगितले. सकाळी ८.४३ वाजता रनवे क्रमांक ११ लँडिंगसाठी पूर्णतः सज्ज करण्यात आला. मात्र त्यानंतर पायलटकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. काही क्षणांतच धावपट्टीच्या डाव्या बाजूला अचानक ज्वाळा आणि धुराचे लोट उठताना दिसले. एटीसीवर कार्यरत असलेल्या एका अधिकाऱ्याने ही माहिती दिली असून, त्यानंतर तत्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले.

### फॉरेन्सिक तपासातून उलगडा

या अपघातामुळे संपूर्ण राज्य हादरले असून, अजित पवार यांच्या निधनाने निर्माण झालेल्या दुःखात आता या दुर्घटनेच्या तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सीआयडी चौकशी आणि फॉरेन्सिक तपासातून नेमकी दुर्घटना कशी घडली, यात कोणती त्रुटी होती का, याचा उलगडा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, बारामती आणि राज्यभरात अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात असून, त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

## शरद पवारांचा दोन्ही NCP एकत्र येण्यास हिरवा कंदील

### अजित पवारांनी घेतल्या होत्या १४ निर्णायक बैठका

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली मृत्यूनं राष्ट्रवादी पक्षासह पवार कुटुंबात आणि महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली. मनपा निवडणुकीपासूनच अजित पवार आणि शरद पवार यांचे पक्ष एकत्र येण्याच्या चर्चांना वाव मिळाला होता, किंबहुना एकत्रिकरणाची अधिकृत घोषणाच बाकी होती, असे सुचवणारी माहिती नुकतीच विश्वसनीय सूत्रांमार्फत समोर आल्यानं आता पडद्यामागं घडलेल्या या घडामोडींनी संपूर्ण राज्याचं लक्ष वेधलं आहे.

सूत्रांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार राष्ट्रवादी एकत्रीकरणासाठी अजित पवारांनी १४ निर्णायक बैठका घेतल्या होत्या. दरम्यान, अजित पवार, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, जयंत पाटील, सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांची शेवटची बैठक मंगळवारी पार पडली. या बैठकीत दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र आणण्यावर अंतिम सहमती होती.

अजित पवार आणि राष्ट्रवादीच्या महत्त्वाच्या नेत्यांच्या अंतिम बैठकीनंतर अजित पवारांची शरद पवारांशी थेट भेट झाली. जिथं शरद पवारांनीही दोन्ही पक्ष एकत्र येण्यास हिरवा कंदील दाखवला. जिल्हा परिषद निवडणूक निकालाच्या दुसऱ्याच दिवशी एकत्रिकरण जाहीर करण्याचा निर्णयही झाला. म्हणूनच उमेदवारांना तुतारीऐवजी घड्याळावर लढवण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदरील संपूर्ण राजकीय प्रक्रियेमध्ये राष्ट्रवादी एकत्रीकरणासाठी कायदेशीर सल्ला घेण्यात आल्याची माहिती असून, शरद पवारांनी कुटुंबप्रमुख म्हणून एकत्रीकरणाची



जबाबदारी स्वीकारली आणि महाराष्ट्राच्या हितासाठी आणि पक्षाच्या भवितव्यासाठी एकत्र येण्यावर भर दिला.

दरम्यान, राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाच्या चर्चांना वेग आलेला असतानाच उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे प्रमुख अजितदादा पवारांचा विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर राष्ट्रवादीची खाती आणि मंत्रिमंडळातील फेरबदलाची चर्चाही सुरू झाली आहे. याप्रकरणी मोठ्या घाडमोडी घडत आहेत. ज्या धर्तीवर राष्ट्रवादीचे पहिल्या फळीतील नेते छगन भुजबळ, सुनिल तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे शुक्रवार ३० जानेवारी २०२६ रोजी मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी वर्षा बंगल्यावर दाखल झाले. या बैठकीत राष्ट्रवादीकडील खात्यांबाबतही चर्चेची तसंच उपमुख्यमंत्रीपदी सुनेत्रा पवारांच्या नावाची चर्चा होण्याची शक्यता आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी ५ ऐवजी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी

**मुंबई/प्रतिनिधीः** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांच्यी प्रक्रिया पूर्ण झाली

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६ च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

## अजित दादांच्या निधनाने झेडपी निवडणूक प्रचाराचा पॅटर्नच बदलला; वाद्य, फटाके नको, घरोघरी जाऊन हात जोडा

**सोलापूर/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने राज्यभर शोककळा पसरली असून तीन दिवस शासकीय दु:खवटा पाळण्यात आला आहे. जिल्हा परिषद निवडणुकांत प्रचाराचा धडाका लावण्यासाठी सकाळी सकाळीच अजित पवार बारामतीत येत असताना त्यांच्या विमानाला अपघात झाला. या भीषण अपघातात अजित पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या अकाली निधनाचा गावखेड्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांनाही धक्का बसलाय. अगदी गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वच स्तरातील, क्षेत्रातील मान्यवरांनी या घटनेवर शोक व्यक्त केला. तर, राज्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांवरही त्याचा परिणाम झाला आहे. अजित पवारांच्या निधनाने प्रचाराचा पॅटर्नच बदलल्याचं पाहायला मिळालं. सोलापूर जिल्ह्यातील बार्शीत एकमेकांविरुद्ध दंड थोपटलेल्या आजी-माजी आमदारांनी तसे आवाहनच कार्यकर्त्यांना केलं आहे.

## प्रभारी प्राचार्य पांडुरंग गोरे यांना पीएच. डी. पदवी प्रदान

**लातूर/प्रतिनिधीः** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य प्रा. पांडुरंग गोरे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांनी इ.स.२००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंबऱ्यातील सामाजिक मूल्य : एक तुलनात्मक अभ्यास या विषयावर सादर केलेल्या शोध प्रबंधास विद्यापीठाकडून मान्यता देऊन डॉ. पांडुरंग गोरे यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना संशोधक मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र महाविद्यालय,निलंगा येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.भास्कर गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.



त्यांच्या या यशाबद्दल सरस्वती संगीत कला महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. राम बोरगावकर,सुरमणी पंडित बाबुराव बोरगावकर, प्राचार्य श्रीहरी तलवारे,डॉ.मारोती गायकवाड,डॉ.लहू वाघमारे,डॉ. दुष्यंत कटारे,डॉ.बालाजी शिंदे,डॉ. वसंत बंडे,प्रा.रवि चव्हाण, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. सलील शहाजिंदे,श्री.विजयकुमार धायगुडे,प्रा.दत्ता राजे,प्रा.डॉ. संतोष कुलकर्णी,प्रा.डॉ. सुदाम पवार,प्रा.डॉ.राम खलंग्रे,प्रा. डॉ.मोनालिसा खानोरकर, प्रा.ज्योती मामडगे,प्रा.अमोल जाधव,श्री.शशिकांत सोळुंके, श्री.विठ्ठल चव्हाण,श्री.कोंडीराम कागले,श्री. बळीराम कदम,श्रीमती भागीरथी लाड,श्री.बाळू आडगळे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**जि.प.व पंचायत समिती निवडणूक आता ७ फेब्रुवारीला...**



### चिमटा दयाचा

**महापौर कोण होणार ! याची उत्स्युकता शिगेला पोहचली !! नागरिकांसह इच्छुकांची धाकधुक वाढली !!**

## रब्बी हंगामासाठी सिंचन प्रकल्पातील पाणी मागणीसाठी ३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

### घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्पाचा समावेश

**लातूर/प्रतिनिधीः** लातूर पाटबंधारे विभाग क्रं. २ विभाग अंतर्गत घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्प, तसेच ९८ लघु प्रकल्प, साठवण तलाव व बॅरेजस आदी प्रकल्पातील पिण्यासाठी आवश्यक आरक्षित पाणीसाठा वगळता उर्वरित पाणी रब्बी हंगामात सिंचनासाठी देण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित पाटबंधारे विभागाच्या शाखा अधिकारी कार्यालयात पाणी मागणी अर्ज सादर करावेत, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

रब्बी हंगाम २०२५-२६ करिता सर्व सिंचन लाभधारकांनी पाणी अर्ज नमुना ७ व ७ अ शासनाने सुधारित केलेल्या नमुन्यात संबंधित शाखा अधिकारी यांचे कार्यालयात पाणी अर्ज भरून शाखा अधिकारी यांच्या कार्यालयात ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत. तसेच कमी पाण्यात येणारी रब्बी हंगामी पिके प्राधान्याने घ्यावीत. प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा विचार करता, प्रवाही सिंचनावरील ऊस आदी बारमाही पिकांसाठी वर्षभर पाणी उपलब्ध राहील, याची शाश्वती देता येणार नाही. त्यामुळे बारमाही पिकांची लागवड करताना याबाबीचा विचार करावा आणि काटकसरीने पाणी वापरावे.

अर्जदार हा संबंधित जमिनीचा मालक असणे आवश्यक आहे. पाणी अर्जासोबत सातबारा उतारा सादर करावा. मागील थकबाकी पूर्ण भरावी व रितसर पावती घ्यावी. पाणी मागणी क्षेत्र ०.२० आरच्या पटीत (कमीत कमी ०.२० आर क्षेत्र) असावे. तसेच अर्जासोबत थकीत पाणीपट्टी भरल्यानंतर पाणी अर्ज मंजूर करण्यात येईल. पाणी अर्ज मंजूर झाल्यानंतर पिकास पाणी घ्यावे. आपआपल्या हद्दीतिल शेतचाऱ्या दुरुस्तीची जबाबदारी संबंधित बागायतदाराची राहील. शेतचारी नादुरुस्त असल्यास मंजुरी दिली जाणार नाही व पाणी दिले जाणार नाही. मंजुरीपेक्षा जास्त क्षेत्र सिंचीत केल्यास हंगामी दराच्या दीडपट दराने आकारणी केली जाईल. पाणी अर्ज न देता पाणी घेतल्यास बिनअर्जी क्षेत्राचे पंचनामे करुन दंडनीय दराने आकारणी करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा सिंचन परवानाधारकाने त्यांचे मंजूर क्षेत्रास ठरवून दिलेल्या तारखेस पाणी कालव्याच्या शेवटपासून ते सुरवात याप्रमाणे घ्यावे. सिंचन नियोजन असल्यास मंजूर कालावधी सोडून कृषीपंप चालू ठेवल्यास सिंचन अधिनियम १९७६ चे कलम ९७ नुसार विद्युत पुरवठा खंडीत करणे, विद्युत मोटारी जप्त करणे, पाणीपरवाना रद्द करणे, व बिगर पाळी पंचनामा करण्यात येईल. शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या प्रचलीत पाणीपट्टीच्या दराने आकारणी करण्यात येईल व त्यावर २० टक्के स्थानीक कर आकारला जाईल. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा काही अपरिहार्य कारणामुळे अथवा तांत्रिक कारणास्तव पाणीपुरवठा शक्य न झाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी पाटबंधारे विभागावर राहणार नाही. प्रसिद्ध केलेल्या पाणी पालीच्या नियोजनाच्या कालावधीत काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक अडचणी उदभवल्यास या जाहीर निवेदनाद्वारे देण्यात आलेल्या पाणी पाळीच्या नियोजनामध्ये बदल करण्याचे हक्क लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवले आहेत. उपसा सिंचन परवानाधारकांनी इतरांना पाणी दिल्यास किंवा मंजूर सिंचन परवान्यातील ५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेची विद्युत मोटार आढळल्यास सिंचन परवाना रद्द करण्यात येईल. जबरदस्तीने अथवा विनापरवानगी गेट उघडल्यास, कालवा फोडून पाणी घेतल्यास पाटबंधारे अधिनियम १९७६ चे खंड क पोटकलम क व ख अन्वये दंडात्मक आणि कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा व ठिबक सिंचन पाणी परवानाधारकांचे पाणी अर्ज प्रथम प्राधान्याने मंजूर करून एकपट दरानेच अकारणी करण्यात येईल. तसेच ज्या लाभधारकांचे पाणी परवाने उपलब्ध नाहीत, त्या लाभधारकांस विनापरवाना व अनाधिकृत पाणी उपसा समजून संबधितास दिडपट दराने अकारणी करण्यात येईल. त्यामुळे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त लाभधारकांनी पाणी परवाने घेवूनच सिंचनासाठी पाणी घ्यावे व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता रो. सु. जगताप यांनी केले आहे.

### फेब्रुवारी महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

**लातूर/प्रतिनिधीः** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु, सद्यस्थितीत लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची अंमलबजवणी सुरु असल्यामुळे ०२ फेब्रुवारी २०२६ रोजीचा लोकशाही दिन स्थगित करण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अजित पवार यांचे अकाली निधन

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या अकाली निधनाने मनाला चटका लावला. असे कसे घडले हाच प्रश्न सर्वासमोर उभा राहीला. वास्तविक अजित पवार राज्याचे सहावेळा उपमुख्यमंत्री बनले होते. त्यांचे चुलते त्यांच्या छत्रछायेखाली राजकारणातील धडे गिरवुन ते परिपक्व असे राजकिय नेते बनले होत. राजकारणात यशस्वी व्हायचे झाले तर जनतेसोबत राहीले पाहिजे, हे अजित पवार ओळखून पश्चिम महाराष्ट्रात त्यांनी आपल्या कामाच्या जोरावर दरारा निर्माण केला होता. जसे शरद पवार यांनी राज्यात काम केले त्याच प्रमाणे काम करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांनी जनतेच्या प्रश्नाला 'नाही' असे म्हटले नाही. सतत काम करीत राहाणे हा त्यांचा हातखंड होता, म्हणून बारामतीच्या नागरिकांना अजित पवार हे आपल्या कुटुंबातील एक आहेत असे समजत होते. त्यांनी आपल्यापक्षाच्या आमदारांना कधीही निधीची कमतरता होवू दिली नाही. विकास केल्याशिवाय जनता स्विकारणार नाही. आपल्याला मानणार नाही. असे त्यांना वाटत होते. जनतेचा सतत संपर्क व तापट स्वभाव. त्यांना अधिकारी, कर्मचारी बोलण्यात घाबरत होते मात्र जनतेला ते कदापी तोडून बोलत नसत. जनतेची तातडीने कामे व्हावीत असे त्यांना सतत वाटत असत. त्यांची कार्यप्रणाली इतरापेक्षा भिन्न होती. जनतेची कामे तातडीने व्हावीत असे त्यांना सतत वाटत असते. त्यांची जनतेत लोकप्रियता अफाट होती. प्रत्येक नागरिकांना त्यांच्याबदल आदर होता. साधे काम असले तरी अजित पवार यांना फोन लावणारी मंडळी बारामतीत होती. जे शरद पवार यांनी कार्य केले त्यानुसार त्यांनी काम चालू ठेवले होते. सतत काम करणे हा त्यांची वृत्ती होती. कोणाचीही सत्ता राज्यात आली तरी ते कायम सरकारमध्ये असायाचे, कारण त्यांना माहिती होते की, सरकारमध्ये असेल तरच जनतेची कामे करता येवू शकतोत. न्याय देवू शकतोत. त्यामुळे कशाच्याही पर्वा त्यांनी केली नाही. सतत सत्तेत राहून काम करण्याची त्यांची शैली वेगळीच होती. सरकारमध्ये त्यांचा दरारा दांडगा होता. कामात आळस नव्हता. काही झाले तरी कामे झाली पाहिजेत हा त्यांचा सतत प्रयत्न होता. त्यामुळे राजकारणात यशस्वी व्हायचे झाले तर जनतेची कामे केली पाहिजेत. हे गणित त्यांनी ओळखले होते. त्यानुसार त्यांनी सतत जनतेसोबत शेवटच्या अंतापर्यंत होते. काम आणि काम करीत राहाणे त्यांचा प्रयत्न असावयाचा. मुळात शरद पवार हे राज्यातील काय देशातील नेते आहेत त्यांच्या तालमित वाढलेले अजित पवार होते. त्यामुळे त्यांची बारीक नजर राज्यात होती. राज्यातील प्रत्येक विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर त्यांचे नेटवर्क होते. कोणत्या तालुक्यात कसे राजकिय वातावरण आहे त्यांना माहिती होते. जेवढे आमदार होते त्यांना कदापी निधी कमी पडू दिला नाही. लातूर जिल्ह्यातील उदगीरला सतत निधी मिळत होता तो अजित पवार यांच्यामुळे होता हे उघड आहे. राज्यात वेगळी चुल मांडणे अशक्य बाब असताना त्यांनी काकापासून राजकियदृष्ट्यावेगळे झाले. त्यानी राष्ट्रवादी पक्ष व घड्याळावर निवडणुक लढविली व मोठे यशही हस्तगत केले. त्यामुळे राजकारणात ते यशस्वी झाले. मुळात त्याचा स्वभाव कडक असला तरी जनतेसाठी ते मृदू स्वभावाचे होते. बारामती परिसरात त्यांची वचक यासाठी होती की, जनतेची कामे नाही केल्यास ते सर्वांची खरटपट्टी करीत असत. त्यामुळे आज प.महाराष्ट्र हा सुधारलेला भाग आहे. त्यांनी प. महाराष्ट्रात सर्वत्र शेतीसाठी पाणी फिरविले. शेतकरी कसा सधन होईल याचाच विचार केला. साखर कारखाने मोठ्या प्रमाणात काढली. सहकारच्या माध्यमातून त्यांनी विकास साधला. सहकार क्षेत्र कसे यशस्वी चालवयाचे या बाबत त्यांनी परिश्रम घेतले. राज्यात प. महाराष्ट्रातच सहकारपद्धतीने काम करता येते व यशस्वी होता येते हे राज्याला दाखवुन दिले. राज्यात त्यांनी अर्थसंकल्प मांडताना जनसामान्य नागरिक हाच केंद्र बिंदु माणून काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. राज्याचे सहावेळा उपमुख्यमंत्रीपद सांभाळणे ते आवघड काम असले तरी त्यांनी ते यशस्वी पारा पाडले. मुळात राज्यात मंत्रीमंडळात त्यांच्यापक्षाचे वर्चस्व होते. महत्वाची खाते त्यांच्या पक्षाकडे होती त्यामुळे राज्याच्या विकासात त्यांच्या पक्षाचा मोठा हातभार लावला हे उघड आहे. मराठवाड्यात त्यांनी निधीची कमतरता भासू दिली नाही. त्यांना माहिती होते की, काम केले पाहिजे. त्यांचे मंत्रीगण सुद्धा त्यांच्या स्वभावाला घाबरत होते. सतत काम करणारा व्यक्ती हा कशालाही घाबरत नसतो. नावात जसे दादा होते तसेच त्यांचे काम ही दादागिरीने करीत असत. राज्यात त्यांना दादा या टोपन नावाने ओळखत असत. त्यामुळे राज्यमंत्रीमंडळात त्यांचा दबदबा कायम होता. बारामतील प्रत्येक कुंटुंबिय हे दादाला आपला माणूस मानतात. शरद पवार यांच्या पावलावर पावुल टाकून त्यांनी यशस्वी वाटचाल सुरु केली होती. ते कधीही अपयशी ठरले नाही. कोणाचीही राज्यात सत्ता आली तरी त्यांना त्यांचे स्थान मिळत असते कारण तसे कर्तृत्वच होते! अर्थसंकल्प मांडताना समतोल राखला जात होता. समतोलपना घसरू दिला नाही. सतत कार्यमग्न राहाणे त्यांचा स्वभाव होता. नुकताच त्यांचा बारामती दौरा झाला. यावेळी गौतम आदणी आले होते. नांदेड येथील कार्यक्रमात सहभाग नोंदविला होता. त्यांची कामाची शैली व चिकाटी मजबुत होती. एखाद्याला आश्वासन दिले तर ते पुर्ण झाल्याशिवाय चैन पडत नसत. शरद पवार यांच्या तालमित वाढले असले तरी स्वकृत्व हे महत्त्वाचे असते ते त्यांनी जीवनअंतापर्यंत पार पडले. त्यांच्या आकस्मित निधनाने राजकिय मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आता राष्ट्रवादीचे नेतृत्व कोणाच्या हाती दिले जाईल किंवा आगामी पक्षाची वाटचाल कशी राहील ही मोठी समस्या आहे. अंतिम काळात शरद पवार यांच्याशी जुळवून घेण्याचा विचार दिसून येत होता. तशी त्यांची वाटचालही दिसून येत होती. जिल्हापरिषद व पंचायत समितीत दोन्ही राष्ट्रवादी एक होवून काम करतील असे दिसून येत होते. काही झाले तरी अजित पवार यांच्या सारखा दुसरा नेता राज्यात होईल असे वाटत नाही. धडाडी व जनतेसोबत राहण्याची त्यांची खुबी इतर कार्यकर्त्यांनी अंगीकारली पाहिजे. राजकारणारत अखंड यशस्वी व्हायचे झाले तर अजित पवार यांचे गुण अंगीकारलेच पाहिजे. हीच खरी श्रद्धांजली आहे.

# राज्याचे खंबीर नेतृत्व, मराठवाड्याचा आधारवड कोसळला!





प्रशासनावरील ज्यांची 'वचक', कामाचा 'उरक' पाहून अधिकारीही थक्क व्हायचे, असे संपूर्ण राज्याचे खंबीर नेतृत्व आज हरपले. अजित (दादा) पवार केवळ एका जिल्ह्याचे मर्यादित नेतृत्व नव्हते, तर ते राज्याचे उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री आणि अल्पसंख्याक विकास मंत्री म्हणून राज्याचा गाडा समर्थपणे हाकत. ते राज्याचे नेते होतेच, पण त्याही पलीकडे जाऊन मराठवाडा विभागावर त्यांचा विशेष लोभ होता. दादा मूळचे पश्चिम महाराष्ट्राचे, पण धाराशिव त्यांचे सासर. त्यामुळे मराठवाड्याचे जावई म्हणून त्यांचा या भागावर जीव होताच, पण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी जिल्ह्याला पितृवत प्रेम दिले.

**तखत श्री हजूर अबचलनगर साहिब जी गुरुद्वारातील ती अखेरची भेट**

अवघ्या दोन दिवसांपूर्वी, २५ जानेवारीला दादा मराठवाडा विभागाच्या दौऱ्यावर, नांदेडच्या पवित्र भूमीत होते. नांदेड येथील तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब गुरुद्वारात ते नतमस्तक झाले. सुरुवातीला उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी पवित्र गुरुद्वारात अत्यंत भक्तीभावाने दर्शन घेतले. कडा प्रसाद ग्रहण केला. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. दर्शन झाल्यानंतर ते गुरुद्वारा परिसरात थांबले. तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिबजीं चे दर्शन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेऊन, बाहेर येईपर्यंत दादा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वाट पाहत होते. त्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर सर्व मंत्री महोदय यांनी पवित्र गुरुद्वारातून एकत्रितपणे ऐतिहासिक हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शताब्दी समागम कार्यक्रमासाठी मोदी मैदानाकडे प्रस्थान केले. राज्याचे नेतृत्व म्हणून ज्येष्ठता आणि पदाचा मान राखण्याची त्यांची ही कृती सर्वांनाच भावली. गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उपस्थित सर्व मान्यवरांचा यावेळी सन्मान केला.

**पालकमंत्र्यांचा धडाका आणि विश्वविक्रम**

एकीकडे नांदेडमध्ये ते अध्यात्मात रमले होते, तर दुसरीकडे बीडमध्ये त्यांनी विकासाचा विक्रम रचला होता. १ जानेवारी २०२६ ला वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी बीडमध्ये एकाच वेळी १३६३ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करून प्रशासनालाही अवाक केले होते.

केवळ इमारती नाहीत, तर निसर्गाशी नाते जोडत त्यांच्याच उपस्थितीत बीडमध्ये एकाच दिवशी ३० लाखांहून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली. याची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. तरुणांवर त्यांचे विशेष प्रेम होते, म्हणूनच खेळाडूंसाठी क्रीडा विभागाचा २५ कोटींचा निधी मंजूर करून त्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे टर्फ ग्राउंड बीडकरांना दिले.

**सहकार आणि अर्थाची जोड**

प्रशासकीय शिस्तीचे भोक्ते असलेल्या दादांनी बीडमध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विभागाच्या भव्य सहकार संकुलाचे भूमिपूजन केले. सर्व सहकारी कार्यालये एकाच छताखाली असावीत, हा त्यांचा आग्रह होता. राज्याचे वित्त व नियोजन मंत्री या नात्याने त्यांनी बीडच्या विकासाला कधीच निधी कमी पडू दिला नाही. १७ सप्टेंबर २०२५ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अहिल्यानगर-बीड' रेल्वेचे उद्घाटन झाले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी २ हजार कोटींपेक्षा जास्त निधी आणि ऐनवेळी दिलेले १५० कोटी रुपये, ही अर्थमंत्री म्हणून दादांनीच मंजूर केले होते.

**हृदयाची काळजी घेणारे दादा**

बीड जिल्हा रुग्णालयात कार्डियाक कॅथलॅब देऊन त्यांनी गोरगरिबांच्या हृदयाची सोय केली. दुर्दैवाने, बीडकरांच्या हृदयाची काळजी घेणाऱ्या पालकमंत्र्यांचे हृदय मात्र आज थांबले.

एकीकडे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे सुकाणू समर्थपणे सांभाळणारे वित्त व नियोजन मंत्री आणि दुसरीकडे बीडच्या प्रत्येक प्रश्नावर बारकाईने लक्ष घालणारे पालकमंत्री... अशी दुहेरी भूमिका त्यांनी समर्थपणे पेलली. धाराशिवचे जावई आणि बीडचे पालक असलेल्या या विकासपुरुषाला भावपूर्ण श्रद्धांजली!

**– डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर.**

# सकाळी डोके जड होऊन दुखायला लागते? आराम मिळवण्यासाठी ट्राय करा 'या' टेक्निक

बहुतांश लोकांना सकाळी उठल्यावर डोके जड झाल्यासारखे वाटते. ताणतणाव, झोपेच्या कमी सवयी, तणाव डोकेदुखी किंवा शहरी प्रदूषणामुळे वाढणाऱ्या सौम्य सायनस समस्या ही यामागची मुख्य कारणे असू शकतात. सकाळी होणारी डोकेदुखी आणि जडपणा काही सोप्या पद्धतीने कमी करता येतो.

तज्ज्ञांच्या मते, या पद्धती खरं तर मज्जासंस्था सक्रिय करणाऱ्या न्यूरोसायन्सवर आधारित या दैनंदिन सवयी आहेत. सकाळी जडपणा कमी करण्यास कोणत्या पद्धती मदत करू शकतात ते आज आपण जाणून घेऊया..

ब्रीदिंग टेक्निक–

ब्रीदिंग टेक्निकनुसार ४ सेकंद श्वास घ्या, ७ सेकंद धरून ठेवा आणि ८ सेकंद श्वास सोडा. तज्ज्ञ सांगतात की ही पद्धत कॉर्टिसोल (तणाव संप्रेरक) कमी करते आणि पॅरासिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय करते. ही पद्धत सकाळी ५ मिनिटांपेक्षा कमी वेळात मन शांत करू शकते.

स्नायूंना विश्रांती देणे

तुमच्या पायाच्या बोटांपासून डोक्यापर्यंत तुमचे स्नायू ताणा आणि सोडा. अभ्यासातून असे दिसून आले आहे की यामुळे रात्रीचा ताण कमी होतो आणि सकाळी शरीर सक्रिय होण्यास मदत होते.

डोक्याची मालिश–

तुमच्या बोटांना लॅव्हेंडर तेल लावा आणि २ ते ३ मिनिटे हलक्या गोलाकार हालचालींमध्ये मालिश करा. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि ताणामुळे होणाऱ्या रक्तवाहिन्यांच्या डोकेदुखीपासून आराम मिळतो.

कोमट लिंबू पाणी प्या

सकाळी सर्वात आधी कोमट पाणी किंवा लिंबू पाणी प्या. तज्ज्ञांच्या मते सकाळच्या सुमारे ३०% डोकेदुखी डिहायड्रेशनमुळे होतात. पाणी रक्तप्रवाह संतुलित करते आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढते.

मान आणि खांद्यांचा व्यायाम–

तुमची मान आणि खांदे प्रत्येक दिशेने १० वेळा हलक्या हाताने फिरवा. यामुळे डेस्कवरील काम आणि चुकीच्या स्थितीत राहिल्याने होणाऱ्या सर्व्हिकोजेनिक डोकेदुखीपासून आराम मिळू शकतो.

# डायबिटीस ते तणावापासून आराम देतात ५ प्रकारचे आयुर्वेदिक चहा, रोज करा सेवन

आजकाल अनेक लोक पुन्हा एकदा आयुर्वेदिक पद्धतींचा वापर करत आहेत. अनेक आरोग्य समस्यांवर औषधी वनस्पती रामबाण उपाय मानल्या जातात. म्हणूनच, प्राचीन काळी अनेक आजारांवर औषधी वनस्पतींनी उपचार केले जात होते. खोकला, सर्दी किंवा सांधेदुखी असो, औषधी वनस्पतींचे सेवन केल्याने अनेक आजार दूर होऊ शकतात.



त्याचप्रमाणे, आपल्या स्वयंपाकघरात असे काही मसाले आहेत जे आपल्यासाठी औषधी वनस्पतींसारखे काम करतात. जर त्यापासून आयुर्वेदिक चहा बनवून त्याचे सेवन केले तर ते अनेक आजारांपासून आराम देऊ शकते. आज आपण अशाच काही आयुर्वेदिक चहाचे फायदे जाणून घेऊया

जास्वंदचा चहा

जास्वंदीचा चहा बनवण्यासाठी ही फुले पाण्यात उकळली जातात. त्यात फ्लेव्होनॉइड्स आणि अँथोसायनिन्स सारखे अँटीऑक्सिडंट्स असतात. हे अँटीऑक्सिडंट्स शरीरातील जळजळ कमी करण्यास आणि शरीराला ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून वाचवण्यास मदत करतात.

दालचिनी चहा

दालचिनीमध्ये सिनामल्डिहाइड आणि सिनामिक अॅसिड सारखे जैविकदृष्ट्या सक्रिय संयुगे असतात. ही संयुगे इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास आणि रक्तातील साखर कमी करण्यास मदत करतात. तुम्ही सकाळी रिकाम्या पोटी देखील ते सेवन करू शकता. दालचिनी चहा बनवण्यासाठी, दालचिनीच्या काड्या २ कप पाण्यात उकळा. पाणी कमी झाल्यावर ते गाळून घ्या आणि थोडे मध घाला आणि ते सेवन करा.

कॅमोमाइल चहा

जर तुम्हाला ताण किंवा चिंता असेल तर तुम्ही कॅमोमाइल चहा करून पिऊ शकता. त्यात एपिजेनिन नावाचे अँटीऑक्सिडंट्स असतात. जे मेंदूला आराम देण्यास मदत करते. तुम्ही झोपण्यापूर्वी ते पिऊ शकता. हा चहा झोपेच्या समस्यांपासून देखील आराम देते.

बडीशेपचा चहा

बडीशेपच्या चहामध्ये अॅनेथोल नावाचे संयुग असते. त्यात अँटीऑक्सिडंट आणि अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्म असतात. ते सेवन केल्याने गॅस, पोटफुगी, बद्धकोष्ठता आणि अपचन यासारख्या पचन समस्या दूर होण्यास मदत होते. ते पचन करण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करते.

# फक्त ७ दिवसात कोलेस्ट्रॉल होऊ शकते गायब! फक्त आहारात करा या फळांचा समावेश

आपल्या खाण्या-पिण्याच्या सवयींचा आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होतो. आपण खात असलेल्या पदार्थामध्ये बदल केल्यास शरीरावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. खाण्याच्या सवयींमध्ये बदल करून आरोग्याच्या अनेक समस्या दूर करता येऊ शकतात. आरोग्यतज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, आहारात बदल करणं अनेकांसाठी खूप फायदेशीर ठरू शकतं. आजकाल असंख्य लोक हाय कोलेस्ट्रॉलमुळे त्रस्त आहेत. ही एक गंभीर समस्या आहे. त्यामुळे हृदयरोग होऊ शकतात. कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी आहारात काही बदल करणं गरजेचं आहे.

हार्वर्ड हेल्थ रिपोर्टनुसार, काही ठराविक पदार्थ खाल्ल्याने शरीरात जमा झालेलं बॅड कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहण्यास मदत होते. काही पदार्थामध्ये विरघळणारं फायबर असतं. हे फायबर आपल्या शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉल काढून टाकू शकतं. काही पदार्थामधून पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स मिळतात. ते देखील एलडीएल म्हणजेच बॅड कोलेस्ट्रॉल कमी करतात. काही पदार्थामध्ये प्लँट स्टेरॉल आणि स्टॅनॉल असतात. हे घटक आपल्या शरीराला कोलेस्ट्रॉल शोषून घेण्यापासून रोखतात. एकूणच, वेगवेगळे पदार्थ वेगवेगळ्या प्रकारे कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी उपयुक्त पदार्थ

– बॅड कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी ओट्स खूप प्रभावी मानले जातात. सकाळी नाश्त्यात एक वाटी ओटमील खाल्ल्याने आपल्याला १ ते २ ग्रॅम सोल्युबल फायबर मिळते. हे फायबर शरीरामध्ये साचलेलं बॅड कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यास मदत करतं. याशिवाय बार्ली आणि इतर होल ग्रेन्सचं सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल कमी होते आणि हार्ड डिसीजेसचा धोका कमी होतो.

– बीन्समध्ये सोल्युबल फायबर जास्त प्रमाणात असतं. ते पचवण्यासाठी शरीराला थोडा वेळ लागतो. याचा अर्थ जेवल्यानंतर तुम्हाला बराच वेळ पोट भरल्यासारखं वाटतं. म्हणूनच वजन कमी करताना बीन्स हा एक उत्तम पर्याय मानला जातो. कोलेस्ट्रॉलच्या रुग्णांसाठी वांगी आणि भेंडी देखील रामबाण उपाय मानले जातात. कमी-कॅलरी असलेल्या भाज्यांमध्ये देखील सोल्युबल फायबर असते.

– बदाम, अक्रोड, शेंगदाणे आणि इतर नट्स आपल्या हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचं अनेक अभ्यासांतून सिद्ध झालं आहे. हे नट्स रोज खाल्ल्याने शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकतं. स्वयंपाक करताना लोणी आणि लार्डच्या स्वरुपातील फॅट्सच्या जागी कॅनोला, सूर्यफूल, करडई आणि इतर वनस्पती तेलांचा वापर केल्याने बॅड कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

– सफरचंद, द्राक्ष, स्ट्रॉबेरी यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये भरपूर प्रमाणात पेक्टिन असते. पेक्टिन हे सोल्युबल फायबर आहे. वनस्पतींमधून काढलेले स्टेरॉल्स आणि स्टॅनॉल्स अन्नातून कोलेस्ट्रॉल शोषण्याची शरीराची क्षमता कमी करतात. दररोज दोन ग्रॅम प्लँट स्टेरॉल किंवा स्टॅनॉल्स घेतल्याने बॅड कोलेस्ट्रॉल सुमारे १० टक्क्यांनी कमी होऊ शकतं.

– सोयाबीन, टोफू आणि सोया मिल्क हे पदार्थ खाणं हा कोलेस्ट्रॉल कमी करण्याचा एक प्रभावी मार्ग मानला जातो. अनेक अभ्यासांतून असं सिद्ध झालं आहे की, दररोज २५ ग्रॅम सोया प्रोटीनचं सेवन केल्याने पाच ते सहा टक्क्यांनी बॅड कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते. आठवड्यातून दोन ते तीन वेळा मासे खाल्ल्याने देखील कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकतं. माशांमध्ये ओमेगा-३ फॅट असते. हा घटक रक्तातील ट्रायग्लिसराइड्स कमी करतो आणि हृदयाचे आरोग्य सुधारतो.

# तुम्ही देखील बंद खोलीत हीटर किंवा ब्लोअर चालू ठेवून झोपता का?

हिवाळ्याच्या महिन्यांत बरेच लोक उबदार राहण्याचा सोपा मार्ग म्हणून त्यांच्या खोल्यांमध्ये हीटर लावतात. आपण आपल्या सोयीसाठी हिटर वापरत जरी असलो तरी त्याचा योग्य वापर करणं देखील तितकचं महत्त्वाचं आहे. रूम हीटर जरी आराम देत असला तरी तो आरोग्यासाठी चागंला की वाईट हे आपल्यापैकी बऱ्याच जणांना माहिती नाही. त्याचप्रमाणे हिटर योग्यरित्या वापरला नाही तर ते कोणते नुकसान होऊ शकतात हे तुम्हाला माहिती आहे का? जर नसेल तर जाणून घेण्यासाठी वाचा...

हीटर वापरणे धोकादायक का आहे?

सीडीसीच्या मते, आजकाल खूप थंडी आहे. बहुतेक शहरी रहिवासी त्यांच्या खोल्या उबदार ठेवण्यासाठी रूम हीटर वापरतात. उष्णता टिकवून ठेवण्यासाठी ते खिडक्या आणि दरवाजे पूर्णपणे बंद करतात, जे खूप धोकादायक असू शकते. यामुळे आगीचा धोका वाढतो आणि खोलीत कार्बन मोनोऑक्साइड जास्त प्रमाणात जमा होऊ शकतो. हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की हा वायू इतका धोकादायक आहे की तो मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या आणि मेंदूतील रक्तस्राव यासारख्या समस्या उद्भवू शकतात. झोपेत गुदम लून तुमचा मृत्यू होऊ शकतो. रूम हीटरचा जास्त वापर केल्याने तुमच्या खोलीतील ऑक्सिजनची पातळी कमी होते. यामुळे श्वास घेताना आपल्या मेंदूला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही.

डोळ्यांची जळजळ: हीटर वापरल्याने खोलीतील हवा कोरडी होऊ शकते. हिवाळ्यात, हवेत आर्द्रता आधीच कमी असते आणि रूम हीटर वापरल्याने ती आणखी कोरडी होते. यामुळे तुमचे डोळे कोरडे होऊ शकतात, ज्यामुळे जळजळ, खाज सुटणे आणि लालसरपणा येऊ शकतो. या कोरडेपणाची भरपाई करण्यासाठी, तुमच्या डोळ्यांमधून जास्त पाणी येऊ शकते, जे खूप त्रासदायक असू शकते. त्वचेवर जळजळ होण्याचा धोका: बरेच लोक रात्री हीटरजवळ झोपतात, परंतु हे खूप धोकादायक असू शकते. आगीचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो, विशेषत: जर वस्तू किंवा कपडे हीटरजवळ ठेवले तर. शिवाय, हीटरच्या तीव्र उष्णतेच्या सतत संपर्कात राहिल्याने त्वचेवर जळजळ होऊ शकते.

कार्बन मोनोऑक्साइडचे उच्च प्रमाण: नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, हीटर, विशेषत: गॅस हीटर, कार्बन मोनोऑक्साइड सोडतो. कार्बन म ोनोऑक्साइड लाल रक्तपेशींवर परिणाम करते, ज्या संपूर्ण शरीरात ऑक्सिजन वाहून नेतात. हा रंगहीन आणि गंधहीन वायू कार्बन डायऑक्साइडपेक्षाही धोकादायक आहे. हा वायू शरीरातील ऑक्सिजन कमी करू शकतो, ज्यामुळे डोकेदुखी, चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास होणे आणि मृत्यू देखील होऊ शकतो.

मुलांसाठी धोका: गरम हवेमुळे कोरडेपणा वाढू शकतो, विशेषत: मुलांमध्ये. अशा परिस्थितीत, थंडीपासून बचाव करण्यासाठी घातलेले लोकरीचे कपडे देखील खाज वाढवू शकतात. ॲॅलर्जी: रूम हीटर वापरल्याने कधीकधी ॲलर्जी होऊ शकते. कारण रूम हीटर चालवल्याने हवेत धूळ आणि ॲलर्जी निर्माण होऊ शकते, जे तुमच्या शरीरात प्रवेश करून ॲलर्जी निर्माण करू शकते. दमा आणि ब्रॉंकायटिस असलेल्या लोकांसाठी हे विशेषत: धोकादायक ठरू शकते. कोरडी हवा: हीटरने गरम केलेली हवा बहुतेकदा कोरडी असते, जी त्वचेसाठी आणि श्वसनमार्गासाठी हानिकारक असू शकते. कोरड्या हवेमुळे नाक कोरडे पडणे, घसा कोरडा पडणे, खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. दमा किंवा ॲलर्जीसारख्या आजार असलेल्या लोकांसाठी हे आणखी गंभीर असू शकते.

# शब्दाला जागणारा नेता काळाच्या पडद्याआड



महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार हे नाव साडेतीन दशके सातत्याने चर्चेत राहिले. लोकसभेची अल्पकालीन कारकीर्द वगळता ते सातत्याने बारामती मतदारसंघातून निवडून आले. विकासाची दूरदृष्टी, परखड, स्पष्टवक्ता, प्रशासनावर पकड आणि राज्याच्या प्रश्नांची जाण असलेल्या अजित पवारांचे विमान अपघातात निधन झाले. बारामतीचा विकास पाहता आमदार कसा असावा, याचे ते ज्वलंत उदाहरण होते.

शरद पवार यांचे पुतणे म्हणून राजकारणात प्रवेश करणारे अजित पवार केवळ त्यांच्या वारशावर उभा राहिले नाही, तर स्वतःची वेगळी ओळख, शैली आणि ताकद निर्माण करून गेले. स्पष्टवक्तेपणा, आक्रमक निर्णयक्षमता आणि प्रशासकीय अनुभव यामुळे ते समर्थकांसाठी 'कामाचा नेता' होते. अजित पवार यांची ओळख प्रामुख्याने एक कडक प्रशासक, वित्तीय शिस्तीचा आग्रह धरणारा आणि निर्णय घेताना फारसा भावनिक न होणारा नेता अशी आहे. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक वेळा राज्याचे अंदाजपत्रक हाताळले. सिंचन, पाणीवाटप, कृषी अर्थकारण आणि पायाभूत सुविधा हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र राहिले. ग्रामीण महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा मोठा प्रभाव राहिला. सहकार चळवळ, साखर कारखाने आणि स्थानिक स्वराज्य संस्था यावर त्यांचे वर्चस्व दीर्घकाळ टिकून राहिले.

त्यांच्या राजकीय प्रवासातील सर्वांत मोठा टप्पा म्हणजे वेळोवेळी घेतलेले धक्कादायक निर्णय.

२०१९ मधील पहाटेच्या शपथविधीपासून नंतरच्या राजकीय घडामोडींपर्यंत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतणे आणि नंतर पक्षातच फूट पाडत वेगळ्या गटासह सत्तेत सहभागी होणे, या घटनांनी त्यांच्या राजकारणातील व्यवहार्य आणि सत्ताकेंद्रित दृष्टिकोन अधोरेखित केला. समर्थकांच्या मते अजित पवार हे वास्तववादी राजकारणी होते. बदलत्या परिस्थितीत निर्णय घेण्याची क्षमता, सत्ता आणि प्रशासन यांचा उपयोग करून विकास साधण्याची त्यांची भूमिका समर्थकांना पटते. 'सत्तेत राहिल्याशिवाय काम करता येत नाही' हा त्यांचा अप्रत्यक्ष संदेश अनेकांना व्यवहार्य वाटल्यामुळेच अनेक आमदार, नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले.

चर्चेच्या केंद्रस्थानी

अजित पवार यांचे नेतृत्व हे करिष्म्यापेक्षा नियंत्रणावर आधारित होते. ते भावनिक भाषणांपेक्षा आकडेवारी, योजना आणि निधी यांवर अधिक भर देत. अधिकारी वर्गावर पकड, निर्णयांची अंमलबजावणी आणि विरोधाला थेट सामोरे जाणे ही त्यांची शैली होती. अजितदादा हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दुर्लक्ष करता न येणारे व्यक्तिमत्त्व आहे. घेतलेले निर्णय, उचललेली पावले आणि निर्माण केलेले वाद यामुळे ते नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. त्यांच्या समकालीन राजकारणाची चर्चा अपूर्ण आहे.

स्पष्टवक्तेपणा, कठोर प्रशासकीय भूमिका आणि आक्रमक राजकारण यासाठी ओळखले जाणारे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अनेक वेळा जबाबदारी सांभाळली. वित्त खाते, नियोजन विभाग यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी हाताळली. अंदाजपत्रकीय बाबींवरील प्रभुत्व आणि आकडेवारीवरील पकड यामुळे ते एक कुशल प्रशासक म्हणून ओळखले जात. त्यांची कार्यशैली अत्यंत शिस्तप्रिय आणि कधी कधी कठोर मानली जाते. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा त्यांना सहन व्हायचा नाही. अधिकार्यांना थेट सूचना देणे, वेळेवर निर्णय घेणे आणि कामाचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य ठरले. पहाटे सहा वाजताच फील्डवर उपस्थित राहणारा आणि वेळ पाळणारा नेता अशी त्यांची ओळख होती. हे दोन्ही गुण पवार कुटुंबाचे वैशिष्ट्य.-पाणी व्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्र हे अजित पवार यांच्या राजकारणातील महत्त्वाचे विषय राहिले. दुष्काळी भागासाठी पाणी उपलब्ध करून देणे, कालवे, धरणे आणि सिंचन प्रकल्प राबवणे यावर त्यांनी विशेष भर दिला. काही प्रकल्पांवरून त्यांच्यावर टीकाही झाली, चौकशी झाली; मात्र त्यांनी नेहमीच आपण घेतलेले निर्णय विकासासाठीच होते, अशी भूमिका मांडली.

अजित पवार यांच्या वाट्याला राजकारणातील चढउतार मोठ्या प्रमाणात आले. पक्षांतर्गत मतभेद, सत्तास्थापनेदरम्यान घेतलेले धक्कादायक निर्णय तसेच राजकीय भूमिका बदल यामुळे ते कायम चर्चेत राहिले.

त्यांच्या निर्णयांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला अनेकदा अनपेक्षित वळण मिळाले. अजित पवार यांचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा थेट संवाद. ते लोकसभा, विधानसभेत किंवा सार्वजनिक सभांमध्ये मुद्देसूद आणि थेट भाषेत बोलत. अलंकारिक भाषेपेक्षा वास्तववादी आणि कधी कधी बोचर्या शब्दांचा वापर ही त्यांची खरी ओळख, ग्रामीण भागातील जनतेला ही शैली आपलीशी वाटते. सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत अजित पवार यांचा दृष्टिकोन प्रामुख्याने व्यवहार्य राहिला. मोठ्या घोषणा करण्यापेक्षा उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर, अंदाजपत्रकीय शिस्त आणि परिणामकारक अंमलबजावणी यावर ते भर देत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर शरद पवार यांच्या राजकीय शिस्तीचा आणि दूरदृष्टीचा प्रभाव होता; मात्र अजित पवार यांनी स्वतःची स्वतंत्र, आक्रमक आणि कधी कधी बंडखोर अशी प्रतिमा निर्माण केली.

प्रभावी भूमिका


सत्तेत असो वा विरोधात; अजितदादांची भूमिका नेहमीच प्रभावी राहिली. अजित पवार हे कार्यक्षम, आणि परंपरागत राजकारणापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारणारे नेते होते. स्पष्टवक्तेपणा, निर्णयक्षमता, कठोर प्रशासकीय भूमिका आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे अजित पवार यांची ओळख एक कठोर प्रशासक नेता अशी निर्माण झाली. ते केवळ राजकारणी नसून एक कार्यक्षम प्रशासक म्हणूनही ओळखले गेले. त्यांच्या नेतृत्वशैलीवर समर्थक आणि टीकाकार अशा दोन्ही बाजूंनी चर्चा होत असे; मात्र त्यांच्या कार्यशैलीत असलेला ठामपणा आणि परिणामकारकता नाकारता येत नाही.

अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे पुतणे होते; मात्र त्यांनी केवळ घराणेशाहीच्या जोरावर राजकारणात स्थान मिळवले, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. बारामती तालुक्यातून राजकारणाची सुरुवात करत त्यांनी हळूहळू राज्यस्तरीय नेतृत्वापर्यंत मजल मारली. उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदार्या त्यांनी अनेक वेळा समर्थपणे सांभाळल्या. त्यांची सर्वांत ठळक ओळख म्हणजे कठोर आणि शिस्तप्रिय प्रशासकीय शैली. कामात दिरंगाई, निष्काळजीपणा किंवा अकार्यक्षमता त्यांना मान्य नसायचा. अधिकारी वर्गाला थेट प्रश्न विचारणे, वेळेची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि निकालाभिमुख प्रशासन यावर त्यांचा भर असायचा. अनेक वेळा त्यांच्या भाषेतील रोखठोकपणा चर्चेचा विषय ठरायचा; मात्र काम लवकर आणि प्रभावीपणे पूर्ण व्हावे, हाच त्यामागील उद्देश असायचा.

सिंचन प्रकल्पांना गती

अजितदादांचा प्रशासकीय कठोरपणा विकासाशी जोडलेला होता. सिंचन, पाणीपुरवठा, शेती, पायाभूत सुविधा आणि अर्थकारण या क्षेत्रांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. जलसंपदा मंत्री असताना त्यांनी अनेक सिंचन प्रकल्पांना गती दिली. अवघड परिस्थितीतही निर्णय घेण्याची त्यांची तयारी असायची. काही निर्णय वादग्रस्त ठरले, तरी ते निर्णय घेण्यापासून मागे हटले नाहीत. राजकीय धाडस, सत्ता संतुलनाचे भान आणि प्रसंगी आक्रमक भूमिका घेण्याची क्षमता यामुळे ते वेगळे ठरले. महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांनी राज्याच्या आर्थिक नियोजनात शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. राज्याचे अंदाजपत्रक मांडताना वास्तववादी आकडे, विकासावर भर आणि वित्तीय शिस्त यांचा समतोल साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून आला. खर्चावर नियंत्रण, योजनांची अंमलबजावणी आणि निधीचा योग्य वापर याबाबत त्यांनी कठोर भूमिका घेतली. अजितदादांची कठोर शैली ही त्यांच्यासाठी ताकद असली, तरी तीच बाब अनेकदा टीकेचे कारणही ठरली. त्यांच्या वक्तव्यांमुळे वाद निर्माण झाले. काही वेळा अधिकारी, विरोधक किंवा प्रसारमाध्यमांवर केलेल्या टिप्पण्यांमुळे त्यांच्यावर टीका झाली; मात्र त्यांच्या शब्दांपेक्षा काम अधिक महत्त्वाचे ठरले. कठोर प्रशासक असूनही अजितदादांनी जनतेशी थेट संवाद साधण्यावर भर दिला. दौरे, आढावा बैठक, प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी यामुळे ते जमिनीवरील वास्तव जाणून घेत. बारामती मतदारसंघातील विकासकामे हे दादांच्या कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण मानले गेले. ते लोकप्रियतेपेक्षा कार्यक्षमतेला प्राधान्य देत. त्यांच्या मते, प्रशासन हे शिस्त, वेग आणि निर्णयांवर चालते. त्यामुळेच त्यांना 'कठोर पण कार्यक्षम प्रशासक' अशी ओळख मिळाली. त्यांच्या कार्यशैलीवर टीका होत असली, तरी राज्याच्या प्रशासनात गती, शिस्त आणि विकासाचा दृष्टिकोन रुजवण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आता मात्र ही सर्व चर्चा थांबणार आहे. राज्यातील जनता नेहमीच त्यांना आठवणींमध्ये जपणार आहे.

## आवश्यक तेवढे पाणी पिणे गरजेचे



आपल्या शरीराचे कार्य सुरळीत चालण्याकरिता आपल्या शरीरास साधारण आठ ते दहा ग्लास पाण्याची दैनंदिन आवश्यकता असते. पाण्यामुळे शरीरामधील अनावश्यक घटक बाहेर टाकले जातात, त्वचा आणि केस निरोगी आणि सतेज राहण्यास मदत मिळते. जेव्हा आपल्या शरीराला पाण्याची गरज असते तेव्हा आपला मेंदू तसा संकेत पाठवत असतो आणि त्यावेळेला तहान लागण्याची भावना होऊन पाणी प्यायले जाते. पाणी हे शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास ही मदत करते. पण जर पुरेसे पाणी शरीराला मिळत नसेल तर त्याचे दुष्परिणामही जाणवू लागतात. जर का हे दुष्परिणाम आपल्याला जाणवू लागले तर आपल्या शरीराला पाण्याची आवश्यकता आहे असे समजावे आणि पाणी पिण्याचे प्रमाण वाढवावे.

जर का आपल्याला दिवसभर थकवा जाणवत असेल, तर याचे कारण शरीरामध्ये पाण्याचे कमी झालेले प्रमाण असणे, हे असू शकते. सतत जाणवणारा थकवा दूर करण्याकरिता चहा, कॉफी किंवा कोल्ड्रिंक घेणे टाळावे. त्याऐवजी वेळोवेळी थोडे थोडे पाणी पीत राहावे. साधारणतः सकाळी उठल्यानंतर शरीरामध्ये पाण्याची मात्रा कमी झाल्याचे जाणवते. त्यमुळे सकाळी उठल्यावर लगेचच एक ग्लास पाणी प्यावे, या मुळे आपल्या शरीराचे मेटॅबॉलिझम सुधारण्यास मदत होईल.

आपल्या शरीराची पचनक्रिया सुरळीत चालण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. शरीरामध्ये पाण्याचे प्रमाण कमी असल्यास मलावरोधाची तक्रार उद्भवू शकते, तसेच डोकेदुखीचाही त्रास होऊ शकतो. अश्या वेळेला या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता थोडे थोडे पाणी सतत पीत राहण्याने या तक्रारी दूर होण्यास मदत मिळेल.

शरीरामध्ये पाण्याची मात्रा कमी झाल्यास डोळे कोरडे पडणे किंवा श्वासास दुर्गंधी येणे अश्या तक्रारी उद्भवतात. अश्या वेळी पाणी पिण्याचे प्रमाण वाढविल्याने या तक्रारी दूर होतात. पुष्कळदा दिवस भराच्या कामानंतर हलकी अंगदुखी किंवा सांधे दुखी सुरु होते. विशेषत: शारीरिक श्रम करणाऱ्यांना पायात गोळे येणे किंवा स्नायूंमध्ये क्रॅम्प्स येणे यासारखे प्रकार घडू शकतात. या तक्रारी दूर करण्यासाठी पाणी पिण्याचे प्रमाण योग्य असणे आवश्यक आहे.

जेवण झाल्यानंतर देखील भूकेची भावना होत असेल, तर हे ही शरीरामध्ये पाणी कमी असण्याचे लक्षण असू शकते. अश्या वेळी काही खाणे टाळून, पाणी प्यावे. या मुळे शरीरामध्ये निर्माण झालेली भूकेची भावना शमेल, तसेच खाल्लेल्या अन्नाचे पचनही व्यवस्थित होईल.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



१. वेगवेगळ्या कारणांनी आलेला ताण-तणाव, डिप्रेशन कमी केल्यास फायदा होतो. त्याकरिता योगासने, प्राणायाम, ध्यान करणे, सकाळी किंवा सायंकाळी फिरणे किंवा तत्सम हलका-फुलका व्यायाम करावा. २. व्यसनापासून मुक्त होऊन सकारात्मक विचार व सकारात्मक जीवन जगण्याचा यशस्वी प्रयत्न केल्यास या व्याधीपासून दूर राहता येईल. ३. जेवणाच्या वेळा ठरवून त्या वेळी नियमित जेवण घेणे, पचायला हलका आहार घेऊन चयापचय बिघडणार नाही याची काळजी घेऊन चहा, कॉफी, शीतपेय यापासून दूर राहिल्यास ही व्याधी जडणार नाही.

## २ Joke — विनोद





बाबू – तुझे वडील किती वर्षांचे आहेत.

राजू – माझ्याच वयाचे आहेत.

बाबू – अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू – का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश



3 cheezo se bani he duniya-
"himmat hosla or dum"
3 lamho se bani he zindagi-
"khushi,ehsaas or gum"
3 cheezo se bani he yeh dosti-
"u,me" or hum....

## ४ Thought — सुविचार




मी तुम्हाला एक शस्त्र दिले आहे, ते म्हणजे विवेकशक्ती. **– गौतम बुद्ध**

### संस्कृत सुभाषित

**धनं रूपमवैक्लव्यं, धनं कुलं सुमंगलम्।**
**धनं यौवनम्लनं धनमायुर्निरायम्।।**

**अर्थ** – संपत्ती म्हणजे काय? विकाररहित रूप, मंगलमय कूळ, सदासतेज तारुण्य आणि निरामय निरोगी आयुष्य म्हणजेच संपत्ती होय.

## महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा





## महत्वाचे



### बीसीसीआयचे माजी अध्यक्ष इंद्रजितसिंग बिंद्रा यांचे निधन

मुंबई: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष इंद्रजितसिंग बिंद्रा यांचे नवी दिल्लीत निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे क्रिकेट जगतावर वर्चस्व असताना बिंद्रा हे केवळ प्रशासकच नव्हते तर भारतीय क्रिकेटमध्ये एक धोरणात्मक व्यक्तिमत्त्व देखील होते. त्यांनी मोहालीला जगातील सर्वोत्तम क्रिकेट स्थळांपैकी एक म्हणून स्थापित केलेच नाही तर भारतात विश्वचषक आणण्यातही मोठी भूमिका बजावली. क्रिकेट प्रशासनात बिंद्राची कारकीर्द बरीच विस्तृत होती. त्यांनी १९९३ ते १९९६ पर्यंत बीसीसीआय अध्यक्ष म्हणून काम केले.

तथापि, पंजाब क्रिकेट असोसिएशन (पीसीए) वर त्यांचा प्रभाव अतुलनीय होता. त्यांनी १९७८ ते २०१४ पर्यंत सलग ३६ वर्षे पीसीए प्रमुख म्हणून काम केले. मोहालीतील भव्य स्टेडियम हा त्यांचा वारसा आहे, ज्याचे नंतर त्यांच्या सन्मानार्थ आय. एस. बिंद्रा स्टेडियम असे नामकरण करण्यात आले. याच मैदानावर २०११ चा ऐतिहासिक विश्वचषक उपांत्य सामना खेळवण्यात आला, ज्यामध्ये भारताने पाकिस्तानला हरवले होते.१९८० पर्यंत विश्वचषक फक्त इंग्लंडमध्येच आयोजित केला जात होता. बिंद्रा, एन.के.पी. साळवे आणि जगमोहन दालमिया यांच्यासह, ही परंपरा मोडली. या तिघांच्या प्रयत्नांमुळेच १९८७ मध्ये पहिल्यांदाच भारत आणि पाकिस्तानमध्ये विश्वचषक इंग्लंडबाहेर आयोजित करण्यात आला. बिंद्रा एक कुशल राजनयिक आणि नोकरशहा देखील होते. माजी भारतीय संघ व्यवस्थापक अमृत माथूर यांच्या मते, १९८६ मध्ये, जेव्हा भारत आणि पाकिस्तानमधील तणाव जास्त होता आणि सुरक्षेच्या कारणास्तव ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड तेथे खेळण्यास नाखूष होते, तेव्हा बिंद्रा यांनीच मार्ग काढला.



# टी-२० क्रमवारीत अभिषेक शर्मा अव्वल स्थानी

नवी दिल्ली : टी २० विश्वचषकापूर्वी भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव दोन अर्धशतकांच्या बळावर टी २० क्रमवारीमध्ये मोठी झेप घेतली आहे. अभिषेक शर्मा टी-२० क्रमवारीमध्ये पहिल्या स्थानावर आहे. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा पहिल्या स्थानावर कायम आहे. नव्या रँकिंगनुसार अभिषेक शर्माचं रेटिंग ९२९ इतकेआहे. अभिषेक शर्माचं करिअर बेस्ट रेटिंग ९३१ इतके आहे. अव्वल क्रमवारीमध्ये दोन भारतीय फलंदाजांचा समावेश आहे. याशिवाय इंग्लंडचे दोन आणि पाकिस्तानचा एक क्रिकेटपटू आहे. सूर्यकुमार यादवनं न्यूझीलंड विरुद्ध दुसर्या आणि तिसर्या टी २० मॅचमध्ये अर्धशतक झळकावलं. यामुळं टी २० क्रमवारीत सूर्यकुमार यादव १२ व्या स्थानावरुन ५ स्थानांची प्रगती करुन ७ व्या स्थानावर पोहोचला आहे. सूर्यकुमार यादवचं रेटिंग ७१७ आहे. न्यूझीलंड विरूद्धच्या मालिकेत सूर्यकुमार यादव फॉर्ममध्ये आहे. सूर्यकुमार यादवनं दुसर्या सामन्यात ८२ धावांची खेळी केली होती. तर, तिसर्या सामन्यात ५७ धावांची खेळी केली होती. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा पहिल्या स्थानावर आहे. त्यानंतर इंग्लंडचा फिल सॉल्ट ८४९ रेटिंगसह दुसर्या स्थानावर आहे. तिलक वर्मा ७८१ रेटिंगसह तिसर्या स्थानी आहे. इंग्लंडचा जोस बटलर ७७० रेटिंगसह चौथ्या स्थानावर आहे. पाकिस्तानचा साहिबजादा फरहान ७६३ रेटिंगसह पाचव्या स्थानावर आहे.भारताचा संघ : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (विकेटकीपर), श्रेयस अय्यर, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल (उप-कर्णधार), रिंकू सिंग, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, ईशान किशन (यष्टीरक्षक), रवि बिश्नोई.

# न्यूझीलंडचा ५० धावांनी विजय

शाखापट्टणम : विशाखापट्टणम येथे झालेल्या चौथ्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडने भारतावर ५० धावांनी विजय मिळवला. २१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. अभिषेक शर्मा शून्यावर तर कर्णधार सूर्यकुमार यादव ८ धावांवर बाद झाला. केवळ १५ चेंडूंत अर्धशतक झळकावून भारताच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या. हे टी-२० क्रिकेटमधील कोणत्याही भारतीयाचे तिसरे सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. त्याने एकूण ६५ धावा (२३ चेंडू) केल्या, मात्र हर्षित राणाच्या शॉटवर गोलंदाजाचा हात लागून चेंडू स्टंपला लागल्याने तो दुर्दैवीरीत्या धावबाद झाला. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. न्यूझीलंडकडून डेवॉन कॉनवे आणि टीम सिफर्ट यांनी दणक्यात सुरुवात केली होती. दोघांनी आक्रमक खेळ केला. त्यांनी जवळपास १२ च्या धावगतीने धावा करताना १०० धावांची भागीदारीही केली. अखेर त्यांची धोकादायक ठरणारी भागीदारी ९ व्या षटकात कुलदीप यादवने तोडली. त्याने कॉनवेला रिंकू सिंगच्या हातून बाद केले. कॉनवेने २३ चेंडूंत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ४४ धावांची खेळी केली. त्यानंतर पुढच्याच षटकात रचिन रवींद्र देखील २ धावांवर बाद झाला. तरी नंतर ग्लेन फिलिप्सने सिफर्टची साथ दिली. सिफर्टने अर्धशतकही पूर्ण केले.



### शिवम दुबेची तुफानी खेळी व्यर्थ

पण १३ व्या षटकात सिफर्टचा अडथळा अर्शदीप सिंगने दूर केला. त्याने रिंकू सिंगच्या हातून त्याला बाद केले. सिफर्टने ३६ चेंडूंत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ६२ धावा केल्या. त्यानंतर मात्र न्यूझीलंडने नियमित अंतराने विकेट्स गमावल्या. आक्रमक खेळणाऱ्या फिलिप्सला १४ व्या षटकात कुलदीप यादवने बाद केले. तो १६ चेंडूंत २४ धावा करून रिंकू सिंगच्या हातून झेलबाद झाला. १६ व्या षटकात मार्क चॅपमनही ९ धावांवर रवी बिश्नोईच्या गोलंदाजीवर बाद झाला. झकारी फोक्सने आक्रमक सुरुवात केली. पण तोही १८ व्या षटकात १३ धावांवर बाद झाला. पण शेवटच्या दोन षटकांत डॅरिल मिशेलने आक्रमक खेळ केला आणि संघाला २० षटकात ७ बाद २१५ धावांपर्यंत पोहचवले. मिशेलने १८ चेंडूंत २ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ३९ धावा केल्या. मॅट हेन्रीने नाबाद ६ धावा केल्या. भारताकडून अर्शदीप सिंग आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराह आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी १ विकेट्स घेतली.

# आताच निवृत्तीचा विचार नाही: लोकेश राहुल

नवी दिल्ली : भारताचा अनुभवी फलंदाज लोकेश राहुलने कबूल केले की, त्याच्या मनात निवृत्तीचा विचार आला होता. मात्र, अद्याप निवृत्तीसाठी काही काळ बाकी असल्याचे सांगत, जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा आपण त्यास उशीर करणार नाही, असे त्याने स्पष्ट केले आहे.इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसनसोबतच्या संवादात राहुलने आपल्या भविष्यातील योजनांवर प्रकाश टाकला. तो म्हणाला, 'निवृत्ती घेणे हा माझ्यासाठी कठीण निर्णय नसेल, कारण क्रिकेटपलीकडेही आयुष्य आहे. मी निवृत्तीबाबत विचार केला आहे. मला वाटत नाही की हा निर्णय घेणे इतके कठीण असेल. जर तुम्ही स्वतःशी प्रामाणिक असाल, तर जेव्हा वेळ येईल तेव्हा ती टाळण्यात काही अर्थ उरणार नाही. अर्थात, याला अजून काही वेळ लागेल.राहुल स्वतःला 'सुपरस्टार' न मानण्यावर भर देत म्हणाला, 'तुमच्याकडे जे काही आहे, त्याचा आनंद घ्या. तुमचे कुटुंबही आहे, त्यामुळे तुम्हाला जे आवडते तेच करा. मी स्वतःला हे समजावण्याचा प्रयत्न करतो की मी खूप महत्त्वाचा नाही. आपल्या देशात आणि जगभरात क्रिकेट सुरूच राहणार आहे.



# टी-२० विश्व चषकासाठी वेस्ट इंडीजचा संघ जाहीर

नवी दिल्ली: वेस्ट इंडीजनं २०२६ च्या टी २० वर्ल्ड कपसाठी १५ जणांच्या संघाची घोषणा केली आहे. दोन वेळा टी २० वर्ल्ड कप जिंकणार्या वेस्ट इंडीजनं यावेळी शाई होपला कॅप्टन केलं आहे. लीग क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करणार्या खेळाडूंना वेस्ट इंडीजनं यावेळी प्राधान्य दिल्याचं पाहायला मिळतं.

वेस्ट इंडीजनं काही दिवसांपूर्वी अफगाणिस्तानचा दौरा केला होता. त्यावेळी टी २० मालिका खेळली होती. त्यापैकी बहुतांश खेळाडूंना घरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. फलंदाजांमध्ये जॉनसन चार्ल्स, शिमरोन हेटमायर आणि ब्रेंडन किंगला संधी देण्यात आली आहे.टी२० वर्ल्ड कप साठी वेस्ट इंडीजचा संघ : शाई होप (कर्णधार), शिमरोन हेटमायर,



जॉनसन चार्ल्स, रोस्टन चेज, मॅथ्यू फोर्डे, जेसन होल्डर, अकील होसेन, शमर जोसेफ, ब्रँडन किंग, गुडाकेश मोती, रोवमॅन पॉवेल, शेरफेन रदरफोर्ड, क्वेंटिन सॅम्पसन, जेडेन सील्स, रोमारिओ शेफर्ड

वेस्ट इंडीजनं वेगवान गोलंदाज म्हणून जेसन होल्डर, शमार जोसेफ, मॅथ्यू फोर्ड आणि जेडन सील्सला संधी दिली आहे. फिरकीपटू म्हणून अकील होसेन, रॉस्टन चेज आणि गुडाकेश मोती यांना संधी देण्यात आली आहे. एविन लुइस आणि अल्जारी जोसेफ यांना संधी मिळालेली नाही. वेस्ट इंडीजनं दोन वेळा टी२० वर्ल्ड कप जिंकला आहे. इंग्लंड, स्कॉटलंड नेपाळ आणि इटली यांच्यासह ते क गटात आहेत. वेस्ट इंडीजचा पहिला सामना ७ फेब्रुवारीला स्कॉटलंड सोबत होणार आहे. बांगलादेश भारतात टी २० वर्ल्ड कपचे सामने खेळण्यास तयार नसल्यानं त्यांच्या जागी आयसीसीनं स्कॉटलंडला संधी दिली आहे. वेस्ट इंडीजनं २०१६ मध्ये शेवटचा टी २० वर्ल्ड कप जिंकला होता.

दरम्यान, भारत आणि श्रीलंका यांच्याकडून संयुक्तपणे टी २० वर्ल्ड कपचं आयोजन करण्यात आलं आहे. ७ फेब्रुवारीला वर्ल्ड कप सुरु होईल आणि ८ मार्चला फायनल होणार आहे. भारतानं २०२४ च्या टी २० वर्ल्ड कपमध्ये विजेतेपद मिळवलं होतं. भारत ते विजेतेपद कायम राखण्यात यशस्वी होणार का याकडे देशातील क्रिकेट चाहत्यांचं लक्ष लागलं आहे.

# इटलीच्या संघाचा दणदणीत विजय

युएई : टी२० तिरंगी मालिकेतील तिसर्या सामन्यात इटलीनेआयर्लंडला हरवून सर्वांना आश्चर्यचकित केले. त्यांनी टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इतिहास रचला. इटालियन क्रिकेट संघाचा पूर्ण सदस्य देशाविरुद्ध हा पहिलाच विजय ठरला. २६ जानेवारी रोजी दुबई येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात इटलीनेआयर्लंडचा चार विकेट्सने पराभव केला. इटलीने शेवटच्या दोन षटकांमध्ये तीन चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. महत्त्वाची बाब म्हणजे, या सामन्यात एका फलंदाजाने थेट भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माच्या कामगिरीशी बरोबरी केली.

इटलीविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडला पूर्ण २० षटके खेळता आली नाहीत आणि १९.४ षटकांत १५४ धावांतच त्यांचा डाव संपला. १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, इटलीला विजयासाठी शेवटच्या दोन षटकांत ३० धावांची आवश्यकता होती. ११व्या क्रमांकावर असलेल्या इटलीच्या फलंदाजाने सामना फिरवला. ग्रँट स्टीवर्टच्या अद्भुत कामगिरीने इटलीने हा इतिहास रचला. १२ चेंडूंत ३० धावा करण्याचे आव्हान त्याने पेलले. इटलीचा



ग्रँट स्टीवर्ट याने शेवटच्या षटकापर्यंत झुंज दिली. ग्रँट स्टीवर्टने सलग तीन षटकार मारून इटलीला विजय मिळवून दिला. ग्रँट स्टीवर्टने १९ चेंडूत नाबाद ३३ धावा केल्या, ज्यात चार षटकारांचा समावेश होता.आयर्लंडच्या पराभवाने क्रिकेट चाहत्यांना नक्कीच आश्चर्य वाटले, परंतु या सामन्यादरम्यान त्यांचा कर्णधार पॉल स्टर्लिंगने रोहित शर्माच्या सर्वाधिक टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या विक्रमाशी बरोबरी केली. स्टर्लिंगने त्याच्या कारकिर्दीत १५९ टी२० सामने खेळले. इटलीविरुद्धचा पराभव आयर्लंडचा कर्णधार पॉल स्टर्लिंगचा १५९ वा टी२० सामना होता.

# दादांच्या अपघाती निधनावर क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांनी वाहिली श्रद्धांजली

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन (चज-) चे अध्यक्ष अजित पवार यांच्या अकाली आणि दुःखद निधनावर क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांनी श्रद्धांजली वाहिली आहे.



**सचिन तेंडुलकर :** अजित पवार यांच्या अकाली निधनाबद्दल ऐकून खूप दुःख झाले. महाराष्ट्राने राज्यभरातील लोकांसाठी काम करणारा एक समर्पित नेता गमावला आहे. देव त्यांच्या आत्म्यास शांती देवो. त्यांच्या कुटुंबियांना आणि मित्रांना माझ्या मनःपूर्वक संवेदना. ओम शांती



**बॉक्सर विजेंदर सिंह :** महाराष्ट्रातील बारामती येथे झालेल्या अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि इतर अनेकांचा मृत्यू झाला. ही एक अत्यंत वेदनादायक आणि हृदयद्रावक घटना आहे. देव मृतांच्या आत्म्यांना शांती देवो आणि शोकाकुल कुटुंबांना हे अपार दुःख सहन करण्याची शक्ती देवो. ओम शांती!



**माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन :** माजी भारतीय क्रिकेट कर्णधार आणि तेलंगणा सरकारमधील सार्वजनिक उपक्रम आणि अल्पसंख्याक कल्याण मंत्री मोहम्मद अझरुद्दीन यांनी एक्स वर पोस्ट केले, अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या बातमीने मला खूप धक्का बसला आहे. मी त्यांच्या कुटुंबियांना आणि प्रियजनांना माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करतो. त्यांच्या आत्म्याला चिरंतन शांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती आणि धैर्य मिळो.



**अजिंक्य रहाणे :** भारतीय क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे म्हणाले, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले आहे. माझ्या संवेदना त्यांच्या कुटुंबासोबत आहेत.




**युसूफ पठाण :** माजी भारतीय क्रिकेटपटू आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार युसूफ पठाण म्हणाले, महाराष्ट्राचे माननीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात अकाली निधन झाल्याने खूप दुःख झाले. ते एक समर्पित नेते होते ज्यांनी अत्यंत वचनबद्धतेने आणि सचोटीने राज्याची सेवा केली. सार्वजनिक सेवा आणि राज्याच्या विकासातील त्यांचे योगदान नेहमीच लक्षात ठेवले जाईल.



**पीटी उषा :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार जी यांच्या अचानक निधनाने धक्का बसला आणि दुःख झाले. महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले असल्याने क्रीडा क्षेत्रात त्यांची अनुपस्थिती जाणवेल. त्यांच्या कुटुंबियांना, मित्रांना आणि समर्थकांना माझ्या मनःपूर्वक संवेदना. ओम शांती, पीटी उषा यांनी इंस्टाग्रामवर शेअर केले.



**पी.व्ही. सिंधू :** पी.व्ही. सिंधूने तिच्या ट्विटरवरुन अजित पवारांच्या निधनासंदर्भात शोक व्यक्त केला असून दादांच्या बारामती भेटीचं माझं स्वप्न अपूर्ण राहिल्याचंही म्हटलं आहे. तुम्हाला अनेकवेळा भेटण्याचे भाग्य मला लाभले. या भेटीत प्रत्येकवेळी तुमची शिस्त, तुमची कार्यपद्धती आणि तुमचे आपल्या लोकांप्रती असलेले प्रेम पाहून मी थक्क व्हायचे. तुम्ही मला नेहमी म्हणायचा, माझ्या बारामतीला नक्की या.. मला वाटायचं की, जाऊ या कधीतरी अजून खूप वेळ आहे, आपण निवांत जाऊ. मात्र, असं काही घडेल आणि मला बारामतीला न जाण्याचा असा पश्चात्ताप करावा लागेल, याचा विचारही मी कधी केला नव्हता अशी प्रतिक्रिया पी.व्ही सिंधून व्यक्त केली. तसेच, अपघातातील मृतांप्रती सहवेदना व्यक्त करत सिंधूने श्रद्धांजली अर्पण केली.



# भाजपला मत म्हणजे विकासाला मत, औसा तालुक्याच्या विकासाला आणखी गती देण्याचे : आमदार अभिमन्यू पवारांचे आवाहन

**औसा/प्रतिनिधी :** सरपंचपदाच्या काळापासून ते आमदारकीपर्यंत औसा तालुक्याचा सर्वांगीण विकास हाच ध्यास ठेवून सातत्याने काम केले असल्याचे प्रतिपादन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले. ''हा मतदारसंघ नसून माझा परिवार आहे,'' असे भावनिक उद्गार काढत त्यांनी आलमला गावासाठी सुमारे ८० लाख रुपयांचा विकासनिधी उपलब्ध करून दिल्याचे स्पष्ट केले. मागील ५० वर्षांत जेवढा निधी मिळाला नाही, त्यापेक्षा अधिक निधी माझ्या आमदारकीच्या काळात या गावाला मिळाला असून पुढेही निधी कमी पडू देणार नाही, अशी ठाम ग्वाही त्यांनी आलमला येथे झालेल्या जाहीर सभेत दिली.

यावेळी मंचावर शितल रविकुमार चिलमे, गंगाबाई माणिकराव कोळेकर (थोरात), बाळिका सदाशीव स्वामी, बसवराज धाराशीवे, किरण उटगे, सूर्यकांतजी शिंदे, कैलास निलंगेकर, रवि चिलमे, दौलत वाघमारे, प्रभाकर कापसे, वीरनाथ लोणारे, शशीकांत पथिल आणि दिपक थोरात आदी उपस्थित होते. आमदार पवार पुढे बोलत होते की ही निवडणूक खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाची असल्याचे सांगत आमदार पवार म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनात्मक व्यवस्थेमुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा व लोकसभा अशा सर्व स्तरांवर लोकशाही बळकट झाली आहे. याच निवडणुकांमधून कार्यकर्ते घडतात आणि नेते तयार होतात, हा आमचा इतिहास आहे, असेही त्यांनी नमूद केले.पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून गावपातळीवर मायक्रो प्लॅनिंग, तळागाळातील प्रश्न, घरकुल, शौचालय, पाणीपुरवठा, वीज, शेतीरस्ते यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करता येते. त्यामुळे या निवडणुकीत विकासावरच बोला, कारण ही निवडणूक विकासाची आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जमीन ओलीताखाली आली असून शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा झाला आहे. औसा येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी सुमारे १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्याचा थेट लाभ सामान्य नागरिकांना होणार असल्याचे त्यांनी सांगितले. ''पाच वर्षांत विकास केला नाही तर मत मागायला येणार नाही,'' असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगत जिल्हा परिषद व पंचायत समिती आमच्या ताब्यात देण्याचे आवाहन केले.

मांजरा नदीचे वाहून जाणारे पाणी अडवून तावरजा नदीद्वारे शेतीसाठी वापरण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. गोगलगाय व अतिवृष्टीमुळे



नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी सुमारे १०० कोटी रुपयांची मदत सरकारकडून मिळवून दिल्याचेही त्यांनी नमूद केले. ''भाजपला मत म्हणजे विकासाला मत,'' असे सांगत औसा तालुक्याचा झपाट्याने विकास करायचा असेल तर जिल्हा परिषद व पंचायत समिती आमच्या ताब्यात द्या, असे आवाहन करत त्यांनी सभेचा समारोप केला.

## जागृती शुगर येथे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार याना श्रद्धांजली



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्य मंत्री अजितदादा पवार यांचे आकस्मिक अपघाताने निधन झाले त्याबद्दल शुक्रवारी जागृति शुगर साखर कारखाना तळेगाव तालुका देवणी येथे दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली

याप्रसंगी जागृति शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले जागृती शुगर चे मुख्य अभियंता अतुल दरेकर अस्वनी प्रमुख विलास पाटील, अक्षय सूर्यवंशी ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार डी पी जाधव जी जी जाधव यांच्यासह जागृती शुगरचे विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी कामगार उपस्थित होते

## चापोलीत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवारांना वाहिली श्रद्धांजली



**चापोली/प्रतिनिधी :** चापोली महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्यानंतर चापोली येथे आज राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने श्रद्धांजली वाहिण्यात आली.

चापोली महात्मा बसवेश्वर चौकात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. चापोलीचे लोकनियुक्त सरपंच भालचंद्र चाटे,उपसरपंच निसार देशमुख, तंटामुक्त अध्यक्ष रामेश्वर होनराव, गजानन होनराव, विश्वनाथ पाटील, नाथा मद्रेवार, शैलेश कदम, मनोज शिंदे, गंगाप्रसाद मद्रेवार, जिलानी शेख, खलील मणियार, डी के कासले, महेश होनराव, गणेश स्वामी सह विविध नागरिक उपस्थित होते.

शाळा महाविद्यालय, बाजारपेठ बंद ठेवून सर्वांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. संजीवनी विद्यालय,स्वामी विवेकानंद विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,नंदादीप इंग्लिश स्कूल, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय अशा विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये श्रद्धांजली सभेचे आयोजन करून आदरणीय अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. चापोलीतील व्यापाऱ्यांनी दिवसभर बाजारपेठ बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण केली.

## बाजार समितीत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण



**लातूर/प्रतिनिधी :**महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे काल दि. २८/०१/२०२६ रोजी विमान अपघातात दु:खद निधन झाले. त्याबद्दल २९ जानेवारी रोजी लातुर येथील कृषि बाजार समितीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी उपस्थित संचालक सर्वश्री अनिल पाटील, आनंद पाटील, सचिन सुर्यवंशी, शिवाजी देशमुख, पवनराज देशमुख प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहा. सचिव सतिश भोसले, दिपक पाटील, बालाजी किसवे अजय गंभीरे सचिन गायकवाड आदी कर्मचारी वृंद उपस्तीत होते.

## दयानंद विज्ञानच्या कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी यांच्या फंडामेंटल अ‍ॅप्रोचेस अ‍ँन्ड अ‍ॅडव्हान्स्ड टेक्निक्स फॉर सिंथेसिस ऑफ नॅनोमटेरियल्स या पुस्तकाचे प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र अनंत चौधरी यांच्या फंडामेंटल अ‍ॅप्रोचेस अ‍ँन्ड अ‍ॅडव्हान्स्ड टेक्निक्स फॉर सिंथेसिस ऑफ नॅनोमटेरियल्स या पुस्तकाचे प्रकाशन दि.२६ जानेवारी २०२६ रोजी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी,कुणाल कोरे,संस्थेचे इतर सदस्य व पदाधिकारी, संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर, प्राचार्य डॉ.पुनम नथानी,प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, प्राचार्य प्रीती पटवारी, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,सेल्फ फायनान्सचे प्रिन्सिपॉल प्रा.अनिलकुमार माळी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

नॅनोटेक्नॉलॉजी अभूतपूर्व कामगिरी आणि क्षमता साध्य करण्यासाठी नॅनोस्केलवर सामग्री हाताळून अनेक क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे.''नॅनोमटेरियल्स: परिचय आणि अनुप्रयोग'' हे एक व्यापक संसाधन आहे जे नॅनोमटेरियल्सच्या मूलभूत संकल्पना, संश्लेषण पद्धती, अद्वितीय गुणधर्म आणि विविध अनुप्रयोगांमध्ये खोलवर जाते.सदरील पुस्तक या क्षेत्राचे सखोल अन्वेषण प्रदान करते, जे विद्यार्थी, संशोधकासाठी एक आवश्यक संदर्भ आहे.हे पुस्तक वाचकांना नॅनोमटेरियल्स,त्यांचे संश्लेषण, गुणधर्म आणि अनुप्रयोगांची व्यापक समज प्रदान करण्यासाठी डिझाईन केलेले आहे, तसेच त्यांच्या जबाबदार विकासासाठी महत्त्वाच्या बाबींवर देखील लक्ष केंद्रित करते.नॅनोटेक्नॉलॉजीच्या क्षेत्रातील रोमांचक प्रगतीमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे एक मौल्यवान संसाधन म्हणून उपयुक्त आहे.

सदरील पुस्तकन सोहळ्याच्या निमित्ताने दयानंद शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व विभाग प्रमुख व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

## दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथे मानसिक आरोग्यावर राष्ट्रीय परिसंवाद

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अध्ययन केंद्राच्या वतीने ''हॉलिस्टिक अप्रोच टू मेंटल वेलनेस'' या विषयावर शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक ताण, अस्वस्थता, नैराश्य व भावनिक थकवा वाढत असून मानसिक स्वास्थ्य जपणे ही काळाची गरज बनली आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे असून ते समग्र दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे व मानसिक स्वास्थ्याकडे सर्वांगीण दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे.

या परिसंवादात प्रा. डॉ मीत शिंदे, प्राध्यापक पी. एन. दोशी कॉलेज, मुंबई, तसेच डॉ. उज्ज्वल अनिल नेने, मानसोपचारतज्ज्ञ, के. ई. एम. रुग्णालय, पुणे, हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात मानसिक आरोग्याशी संबंधित सामाजिक, मानसिक व कायदेशीर पैलूंवर तज्ज्ञांकडून सखोल विचार मांडले जाणार आहेत.

या राष्ट्रीय परिसंवादाचा लाभ संशोधक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानववादाचे प्रणेते- डॉ. मकरंद गिरी

**लातूर/प्रतिनिधी :** पंडित दीनदयाळ उपाध्याय हे लेखक, पत्रकार आणि भारतीय जनसंघाचे नेते होते. मथुरेत जन्मलेल्या दीनदयाळांनी साधे जीवन जगून देशासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाचा अंत्योदय विचार मांडला आणि एकात्म मानवतावाद ही विचारधारा दिली, जी भारतीय संस्कृतीवर आधारित आहे. ते

एकात्म मानववादाचे प्रणेते आहेत असे विचार डॉ. मकरंद गिरी यांनी मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयाच्या मौजे खोपेगाव ता. जिल्हा लातूर येथे आयोजित प्राचार्य डॉ. आशा मुंडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. एस. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली

राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक श्रमसंस्कार युवती शिबीराच्या कार्यक्रमानिमित्त ते बोलत होते.



यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, मुख्याध्यापक श्री अरुण सुरवसे, श्री गरिबे सर, सौ. सावरीकर मॅडम, प्रा. सुनील भोसले, डॉ.मनोज पाटील, डॉ. संग्राम टेकले, प्रा. भाऊसाहेब पुरी डॉ. विद्यादेवी कांबळे, डॉ. मुक्ता गंगथडे, प्रा. अलका शिंदे, प्रा.प्रशांत खटके, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. रुपाली कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे आपल्या व्याख्यानामध्ये डॉ., मकरंद गिरी म्हणाले की,

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानववाद हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, समाज आणि व्यक्ती स्वतंत्र नसून ते एकात्म आहेत. मानवतावादाचा विचार हा केवळ भौतिक सुखावर नसून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही पुरुषार्थांच्या समतोल साधनेवर आधारित आहे.

अंत्योदय म्हणजेच शेवटच्या माणसाचा विचार त्यांच्या विचारसरणीचा गाभा अंत्योदय हा होता, ज्याचा अर्थ समाजातील शेवटच्या स्तरावर असलेल्या शेवटच्या माणसाचा विकास होय.

त्यांचे साधे राहणीमान आणि उच्च विचारसरणीचे प्रतीक होते. त्यांचे विचार आजही भारतीय राजकारणात, विशेषतः सामाजिक कल्याणाच्या योजनांमध्ये जसे प्रधानमंत्री आवास योजना, आरोग्य योजना यामध्ये मार्गदर्शक मानले जातात, जे एकात्म मानववादाच्या तत्त्वावर आधारित आहेत.एकूणच,

पंडित दीनदयाळ उपाध्याय हे केवळ राजकारणी नव्हते, तर एक महान समाज सुधारक आणि मानवतावादी विचारवंत होते, ज्यांनी भारताला भारतीय संस्कृतीवर आधारित एकात्म मानववादाचा विचार दिला त्यांच्या अंत्योदय विचारांचे महत्त्व आजही टिकून आहे असे मौलिक मार्गदर्शन डॉ. मकरंद गिरी यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शामराव शेंडगे यांनी तर अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री अरुण सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर देशमुख तर आभार डॉ. प्रणिता पाटील यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. मारुती घाडगे, प्रा.नागनाथ पांचाळ,प्रा. शहाजी आरण, डॉ. पांडुरंग देशमुख, डॉ शंकर कोळगिरे, प्रा. दत्ता पवार, प्रा. रहीम शेख, प्रा. तानाजी बडे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी स्वयंसेवक विद्यार्थिनी,शाळेतील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## जनतेला समर्पित नेतृत्व गमावले - अजित पाटील कव्हेकर

**लातूर/प्रतिनिधी :** मातीशी नाळ जोडलेला आणि कार्यकर्त्यांना सदैव उपलब्ध होणारे राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी कायम राज्याच्या हिताचा आणि विकासाचा ध्यास घेतला होता. खऱ्या अर्थाने जनतेला समर्पित असणारे नेतृत्व आपण गमावले असल्याचे सांगून त्यांच्या सारखा नेता पुन्हा होणे नाही अशा शब्दात लातूर भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

लातूर येथील शहर जिल्हा भाजपाच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष अजित कव्हेकर पाटील बोलत होते. यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, सरचिटणीस संजय गीर, प्रविण कस्तुरे, मंडल अध्यक्ष रोहित पाटील, राहुल भुतडा, सचिन सुरवसे, अ‍ॅड. प्रदिप मोरे आदींची उपस्थिती होती. उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार हे लोकनेते असल्याचे सांगून त्यांचा तळागाळापर्यंत जनसंपर्क होता. असे अजित पाटील कव्हेकर म्हणाले. अजित दादा पवार यांचे अपघाती निधन सर्वांसाठी धक्कादायक व दुखदायक असून त्यांच्या जाण्याने राज्याची मोठी हानी झाली आहे. अहोरात्र जनतेसाठी झटणारे कर्तव्यदक्ष नेता म्हणून ओळख असणारे अजित पवार तितकेच स्पष्टवक्ते व परखड होते. रोखठोक भूमिका मांडताना त्यांनी संवेदनशीलपणा जपलेला होता. जनतेसह कार्यकर्त्यांशी थेट संपर्क असणारे दादा राज्याच्या विकासासाठी अग्रेसर राहिलेले होते. प्रशासनावरील पकड व अधिकारी वर्गात असणारा त्यांचा दरारा त्यांच्या कार्यकुशलतेचा सातत्याने साक्षी देणारा होता. राजकारणा पलीकडे जाऊन अनेकांशी त्यांनी आपले संबध जपलेले होते. त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला अजित पवार आपल्या कुटुंबाचे भाग आहेत असेच वाटत होते. त्यांच्या अकाली निधनाने राज्याचीच नव्हे तर देशाची हानी झालेली असून हि पोकळी भरून निघणे अशक्य असल्याचे अजित पाटील कव्हेकर म्हणाले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बोलीमुळेच मराठी भाषा व संस्कृती समृद्ध होते – डॉ.सुनीता सांगोले

## दयानंद विज्ञानमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त बोलीचा जागर कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी:** मराठी भाषा संवादाचे प्रभावी माध्यम असून ती विविध बोलींनी नटलेली समृद्ध भाषा आहे.महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बोलल्या जाणाऱ्या बोली मराठी भाषेच्या वैभवाचे प्रतीक आहेत.मराठी भाषेत कोकणी,पुणेरी,अहिराणी,

मालवणी,माणदेशी,बेळगावी अशा विविधांगी बोली बोलल्या जातात.बोली ह्या भाषेचा भाग असतात,त्यातून समाजाची संस्कृती व परंपरा समृद्ध होते.बोलीच भाषेला समृद्ध करत असतात.प्रमाणभाषा ही लिखित असते. पण मनातल्या अंतरिक भावना बोलीतूनच सक्षमपणे मांडता येतात.बोलीत अनेक प्रभावी म्हणी,वाक्यप्रचार आहेत.याशिवाय आकलनाचा परिघ रूंदावण्यासाठी बोलीच महत्त्वाच्या आहेत.म्हणूनच बोलीविषयी मनात असलेले गैरसमज व न्यूनगंड टाळले पाहिजे.कारण बहिणाबाईने बोलीतूनच अप्रतिम काव्याची निर्मिती केली.बोलीचे सौंदर्य जपले पाहिजे.लहान वयापासूनच बोलीतूनच संस्कार होतात.बोलीसंदर्भात जास्तीत जास्त संशोधन झाले पाहिजे आणि मराठीतील बोलीचे जतन व संवर्धन झाले पाहिजे,असे प्रतिपादन लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनीता सांगोले यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भाषा विभागाच्या वतीने दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत साजरा होणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त ' बोलीचा जागर ' या उद्बोधनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते.यावेळी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.याप्रसंगी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ. रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रामशेट्टी शेटकार यांनी केले तर आभार डॉ.गजानन बने यांनी मानले.यावेळी सुनील राक्षे,बालाजी यमपुरे,शंकर भालके यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पवार कुटुंबियांचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्याकडून सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय नेते, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पार्थिवाचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी काटेवाडी येथील निवासस्थानी आणि बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर जाऊन अंत्यदर्शन घेतले. पवार कुटुंबीयांचे तसेच खासदार सुप्रियाताई सुळे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

महाराष्ट्राचे हित डोळ्यासमोर ठेवून कार्य करणारा एक मोठा नेता महाराष्ट्राने गमावला आहे. अजितदादा हे महाराष्ट्राचे लाडके नेते होते. घराघरात पोचलेले दादा होते. लोकसेवेसाठी त्यांनी स्वतःचे आयुष्य वाहून घेतले होते. आम्हाला त्यांच्याकडून हा लोकसेवेचा संस्कार शिकता आला. मी पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर विधिमंडळात आलो, त्यावेळी अजितदादांनी कायम मार्गदर्शन केले. आमदार म्हणून जबाबदारी काय असते, विधिमंडळात प्रश्न कसे मांडावेत अशा विविध विषयांवर नव्याने निवडून आलेल्या युवा आमदारांना ते सल्ला द्यायचे. अशावेळी 'समोरचा आमदार कोणत्या पक्षाचा आहे', हे ते पहायचे नाहीत. विविध पक्षातील नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी त्यांचे मैत्रीचे, आपुलकीचे संबंध होते. त्यांचे कार्य, त्यांनी दिलेले योगदान कायम नवी दिशा देणारे आहे.

आदरणीय विलासराव देशमुख साहेब, आदरणीय गोपीनाथ मुंडे साहेब, आदरणीय आर. आर. पाटील साहेब, आदरणीय अजितदादा पवार साहेब हे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून घडलेले, ग्रामीण महाराष्ट्राने घडवलेले नेतृत्व आहे. त्यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. महाराष्ट्राला विकासाची दिशा दिली. या नेत्यांनी महाराष्ट्राची आणखी दीर्घकाळ सेवा केली असती. पण हे नेते आज आपल्यात राहीले नाहीत. ही कधीही भरून न निघणारी मोठी पोकळी आहे, अशा भावना यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

# चन्नबसवेश्वर फार्मसीचे भातांगळी येथे रा.से.यो. विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्घाटन




**लातूर/प्रतिनिधी:** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री) यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भातांगळी (ता. लातूर) येथे दि. २७ जानेवारी २०२६ रोजी ''शाश्वत विकासासाठी युवक जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसदभूमी विकास'' याशीर्षकाखाली वार्षिक विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून गावचे आदर्श सरपंच मा. श्री. परमेश्वर पाटील, मुख्याध्यापक श्री. किशोर गायकवाड, मुख्याध्यापक श्री. उत्तम दुरवे, प्र. प्राचार्य डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, ग्रामपंचायत सदस्य श्री. दिलीप मुक्ता, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. भिमाशंकर हुच्चे, प्रा. महेश मानके, अविनाश मठपती, प्रा. बालाजी अजगुंडे, डॉ. ऐश्वर्या ईरापल्ले, श्री. रोहित भरती, श्री सुखराज गरगट्टे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.

उद्घाटनानंतर रा.से.यो. विशेष शिबिराच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. शिबिराअंतर्गत स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य व स्वच्छतेबाबत जनजागृती, पाणी बचत अभियान, व्यसनमुक्ती जनजागृती, तसेच प्राथमिक आरोग्य तपासणी अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे, समाजसेवेचे महत्त्व, विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी, स्वच्छ व निरोगी समाजनिर्मिती यावर मार्गदर्शन केले. रा.से.यो. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता समाजासाठी जबाबदारीने कार्य करावे, असे आवाहन डॉ. भुसनुरे यांनी केले. या कार्यक्रमात रा.से.यो स्वयंसेवक विद्यार्थी तसेच भातांगळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# महिला सक्षमीकरणाची चळवळ समाजात तळागळापर्यंत पोहचणे गरजेचे – प्रा.डॉ.कुसुम ढोणे




**लातूर/प्रतिनिधी:** महिला सक्षमीकरण ही आजच्या काळाची गरज असून महिलांचे सक्षमीकरण करण्याकरिता आपल्या देशात महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुले करून महिला सक्षमीकरणाचा पाया रचला.भारतीय संविधानाने राजकीय,सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात पुरुष आणि महिलांना समान संधी आणि अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराविषयी समाजातील तळागाळातील महिलांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ.कुसुम ढोणे यांनी केले. त्या लातूर येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयाच्या वतीने मौजे सेलू ता. औसा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराप्रसंगी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बोलत होत्या.

याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. सुनील पुरी, सौ. पूजा पंडगे,श्री.तुकाराम पवार,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.सुनील पुरी म्हणाले की, देशात महिलांचे स्थान व स्थिती पाहून तुम्ही देशाची स्थिती सांगू शकता. राष्ट्राची प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधायची असेल तर महिला सक्षमीकरण अत्यावश्यक आहे.महिला सक्षमीकरणासाठी समाज, देश आणि महिलांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्रीमंत दोरवे यांनी केले,सूत्रसंचालन प्रा.रवि चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. वसंत बंडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी,महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# लातूर जिल्ह्यात १७ कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द

**लातूर/प्रतिनिधी:** रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खत आणि कीटकनाशकांचा पुरवठा होण्यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. पुणे येथील संचालक (नियंत्रण व गुणनियंत्रण) कृषी आयुक्तालयाच्या सूचनेनुसार लातूर जिल्ह्यात भरारी पथक आणि कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) यांनी कृषी निविष्ठा केंद्रांची तपासणी केली होती. तपासणीदरम्यान काही केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्याने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली ८ जानेवारी २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत एकूण १७ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. या मध्ये बियाणे विक्रीचे १३, खत विक्रीचे २ आणि कीटकनाशक विक्रीचे २ परवाने रद्द झाले आहेत.तसेच ८ कृषी निविष्ठा केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

साठाफलक व भावफलक प्रदर्शित न करणे, साठा नोंदवही आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, भावफलक, साठा नोंद अद्ययावत न ठेवणे, विक्री बिलावर शेतकऱ्यांची सही/अंगठा न घेणे, बियाण्यांचा संपूर्ण तपशील बिलात न लिहिणे, उत्पादकाचा स्त्रोत न दर्शविणे, ई-पॉस वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, खतासोबत इतर निविष्ठांची लिंकिंग करणे, परवाना असूनही दुकान बंद ठेवल्यास बियाणे अधिनियम १९६६, नियम १९६८, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, खत नियंत्रण आदेश १९८५, कीटकनाशक कायदा १९६८ आणि कीटकनाशक नियम १९७१ नुसार कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी स्पष्ट केले.

रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार
www.latursamachar.com

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

## गांधीजी..

गांधीजी पुण्यतिथी
परिधान करे खादी
एक दिवसी उत्सव
आम्हीचं गांधीवादी

गांधी पुतळ्यापाशी
सर्व पक्षीयाची गर्दी
हारा फुलांचा खच
सगळे देतात वर्दी

पिणारं नाही लिकर
पाळणारं दारु बंदी
अशा तारखेचीसोय
करून ठेवतो आधी

नकोरे मांस मच्छी
आम्ही अहिंसावादी
दुसरे दिवसासाठी
भली लांबडी यादी

सर्वत्र ते गांधीगांधी
एकदिवसाची नांदी
माहीतनाही बापूजी
पुन्हा आठवी कधी

आचार विचारांमध्ये
कुठे नसतात गांधी
विसरून जातो कसे
गोष्ट ही सरळ साधी

कळतीलं खरे गांधी
करता आत्मा शुध्दी
रे अंत्योदय सूर्योदय
जगभरा शांती वृध्दी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# दिवंगत नेते स्व.अजितदादा पवार यांना मांजरा साखर कारखाना येथे श्रध्दांजली अर्पण

**लातूर/प्रतिनिधी:** विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांना त्यांच्या दु:खद निधनाबद्दल भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.


यावेळी त्यांच्या सार्वजनिक जीवनातील कार्याबद्दल आदर व्यक्त करण्यात आला.स्व.अजितदादा पवार यांनी सहकार चळवळीला दिलेले योगदान अतुलनीय आहे. साखर कारखाने, दूध संघ, सहकारी बँका व पतसंस्था यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आर्थिक बळ वाढवण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय उल्लेखनीय आहे. अजितदादा पवार यांनी शेतकरी, कामगार व सहकारी संस्थांच्या हितासाठी सातत्याने घेतलेली भूमिका सहकार क्षेत्रासाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकराव काळे, कार्यकारी संचालक विविध खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने मोठ्या प्रमाणात प्रगती होत असताना दिसून येत आहे. क्वांटम विज्ञानातून भविष्यातील संशोधनाला चालना मिळेल असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (आयएपीटी) यांच्या संयुक्त विद्यमाने The Quantum Enigma: Unveiling Reality Secrets या विषयावर एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार आयोजित करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ.के.एम.जाधव, Mahle




Constructor University, Slovenia येथील डॉ.झाक्लिना लुबेई, Velika Gorika, Zagreb, Croatia येथील अन्तोनिजा बरीसिक, प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, मुख्य संयोजक डॉ.एस.एम. डोंगरगे, सहसंयोजक डॉ.ए.एच.हेडाव, सह संयोजक प्रा.आर.एस.देव्हडे, डॉ.एम.एम.बेटकर आणि डॉ.अमित पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ.के.एम.जाधव यांनी नवीन तंत्रज्ञान हे क्वांटम तंत्रज्ञानावर आधारित आहे असे सांगितले. तर आंतरराष्ट्रीय स्तरावरून डॉ. झाक्लिना लुबेई यांनी मानवाच्या मेंदूची रचना आणि कार्यपद्धती नैसर्गिकरित्या वेगवेगळी असते आणि ही वेगळेपणाची अवस्था आजारपण नसून मानवी विविधतेचा भाग आहे असे सांगितले.

अन्तोनिजा बरीसिक यांनी आधुनिक जगात भौतिकशास्त्राचा वापराबद्दल माहिती दिली. तर डॉ. जी. एच. जाधव यांनी फोटॉन सिद्धांत, नॅनो-स्केल डिव्हाइसेसमधील चार्ज कॅरिअर मॉडेलिंग, क्वांटम फिजिक्सचे आधुनिक नियम आणि सेमीकंडक्टर डिव्हाइस स्केलिंगवरील क्वांटम परिणाम या विषयांवर सविस्तर माहिती दिली. आइनस्टाईच्या क्वांटम सापेक्षकांच्या काही संकल्पनांवर आक्षेप घेऊन त्यांच्या विरुद्ध सापेक्ष प्रात्यक्षिक मांडून क्वांटमच्या नवीन संशोधनाला वाट करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रात्यक्षिकासाठी ते प्रयत्नशील आहेत असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर. एस.देव्हडे यांनी केले प्रमुख पाहुण्यांचे परिचय प्रा.डॉ. अविनाश हेडाऊ यांनी केले तर आभार डॉ.करणसिंह मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.राम पाटील, प्रा.पंकज साळवे, प्रा.गोपाल रांजनकर, प्रा.पी.एल.पाटोळे, प्रा.ए.एस.कल्याणी, प्रा.एस.सी.राजे, प्रा.सोनाली खुब्बा यांचे सहकार्य लाभले.

या आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतून मिळून ३१७ प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६